बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १४२ वा | मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## हक्काचे उर्वरित १६ टीएमसी पाणी लवकरच मराठवाड्यात:जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची धाराशिव दौऱ्यात घोषणा

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- दुष्काळमुक्त महाराष्ट्र हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या न्याय हक्काचे उर्वरित १६ टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळवून दिल्याखेरीज आपण स्वस्थ बसणार नाही. समुद्रात वाहून जाणारे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पाणी मराठवाड्यात वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प मुख्यमंत्र्यांनी हाती घेतला आहे. त्यासाठी जागतिक बँकेचे सहकार्य घेतले जात आहे. आता महाराष्ट्र बदलत आहे. तो थांबणार नसल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्ती कामाचे भूमिपूजन ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते धाराशिव तालुक्यातील करजखेडा येथे पार पडले. यावेळी ते बोलत होते. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील हे तेरणा उपसा सिंचन योजनेचे शिल्पकार आहेत. त्याचबरोबर त्यांच्यामुळेच कृष्णा खोर्यातील हक्काचे पाणी मराठवाड्यासाठी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय झाला आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी ज्या तळमळीने शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अविरत काम केले, तीच तडफ अभ्यासू, कर्तबगार आणि धडाडीचे नेते राणाजगजितसिंह पाटील यांच्या ठायी आहे. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्यामुळेच अशक्यप्राय असलेली निम्न तेरणा उपसा सिंचन योजना लवकरच कार्यान्वित होणार आहे. आम जनतेच्या अडचणी दूर करणे हे आपल्या महायुती सरकारचे काम आहे. पुढच्या ऑगस्टपर्यंत ही योजना पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेकरिता बंद पाईपलाईन मंजूर करण्यात यावी, अशी विनंती केली. निधीची तरतूद आवश्यकतेप्रमाणे करून वर्षभरात हे काम पूर्णत्वाकडे नेण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी यावेळी नमुद केले. करजखेडा येथील पंपगृहात फ्लोटींग सोलार व्यवस्था करण्याची मागणीही यावेळी आमदार पाटील यांनी केली. जिल्ह्यात ३३ मोठ्या प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यातून जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलल्याखेरीज राहणार नाही. तसेच कॅनॉल सिमेंट लाईन साठीही निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी यावेळी आमदार पाटील यांनी यावेळी केली.

यावेळी आमदार श्री. प्रवीण स्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कारखान्याचे चेअरमन श्री. अरविंद गोरे, तेरणा कारखान्याचे माजी चेअरमन श्री. सुरेशभाऊ देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष श्री. दत्ता कुलकर्णी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. नेताजी पाटील, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष श्री. नितीन काळे, मजूर फेडरेशन चेअरमन सतीश दंडनाईक यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोटरी क्लबच्यावतीने ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरुम येथे रक्षाबंधन उत्साहात साजरा




मुरूम (सुधीर पंचगल्ले)-दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी ठीक सायंकाळी सहा वाजता रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरूम येथे रक्षाबंधन मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र लोहारा येथील सरिता बहनजी होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी आणि सचिव कल्लप्पा पाटील हे होते.

ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाचे मुख्य केंद्र राजस्थान मधील माउंट आबू येथे असून त्यांच्या अनेक शाखा जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये आहेत. त्यांच्या माध्यमातून अध्यात्मिक शांतता आणि ध्यानधारणा हे मानव कल्याणासाठी किती महत्त्वाचे आहे याचा प्रसार आणि प्रचार करणारी एक आध्यात्मिक विश्वविद्यालय आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले.

ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरूम येथील सर्व बहनजी यांनी रोटरी क्लब मुरूमच्या सर्व सदस्यांना राखी बांधून रक्षाबंधन उत्साहात साजरा केला. अध्यक्षीय समारोपात सरिता बहनजी म्हणाल्या रक्षाबंधन हे एक बहीण भावाच्या नात्यातील दुरावा कमी करण्याचे काम करते आणि प्रेम वाढवण्याचे काम हे रक्षाबंधनाच्या माध्यमातून होतं. रक्षाबंधन हे बहिण भावाचे पवित्र नातं जपण्याचे काम या माध्यमातून होतं आणि हे कायमस्वरूपी टिकावं यासाठी आम्ही ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या माध्यमातून प्रयत्न करतो.

या कार्यक्रमात रक्षाबंधनाची भेट म्हणून रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने आणि रोटे शरणाप्पा धुम्मा यांच्या सौजन्याने ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय मुरूम केंद्राला फ्रिज भेट देण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाचे प्रमुख राजू भैय्या यांनी केले तर आभार रोटरी क्लब मुरूम सिटीचे सचिव कल्लप्पा पाटील यांनी केले.

या कार्यक्रमासाठी रोटे सुनील राठोड ,रोटे.डॉ. नितीन डागा, अँड. उदय वैद्य, प्रा राजेंद्र वाकडे, रोटे प्रकाश रोडगे, रोटे विष्णुदास मुंदडा आणि ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय मुरूम केंद्राचे भक्तगण उपस्थित होते.

## श्री सिद्धिविनायक परिवारातील दोन्ही कारखान्यांच्या रोलर पूजन



धाराशिव (प्रतिनिधी)- श्री सिद्धिविनायक परिवारातील तुळजापूर तालुक्यातील देवकुरुळी येथील श्री सिद्धिविनायक ग्रीटेक युनिट क्रमांक १ व खामसवाडी येथील श्री सिद्धिविनायक ग्रीनटेक युनिट क्रमांक २ या दोन्ही गुळ कारखान्यांच्या गळीत हंगाम २०२५-२६ या वर्षी उत्साहात प्रारंभ झाला. रविवार, दि. १० रोजी या दोन्ही कारखान्यांच्या रोलर पूजनाचा कार्यक्रम संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या हस्ते सहकुटुंब धार्मिक पूजा करून पार पडला. या वेळी कुटुंबीयांसह खामसवाडी आणि देवकुरुळी येथील ग्रामस्थ कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील चार-पाच वर्षांपासून या दोन्ही कारखान्यांमार्फत ऊसाचे गाळप होत असून, कारखाना परिसरातील शेतकऱ्यांमध्ये श्री सिद्धिविनायक परिवाराबद्दल दृढ विश्वास निर्माण झाला आहे. मागील हंगामात सुमारे सव्वादोन लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्यात आले होते.

तर यावर्षी तीन लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, प्रतिदिन तीन हजार मेट्रिक टनांपेक्षा अधिक गाळप करण्यात येणार असल्याचे दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हितासाठी जलद पेमेंट व्यवस्था ठेवण्यात आली असून, ऊस खरेदी नंतर अवघ्या १५ ते ४५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जाते. तसेच, हंगाम २४-२५ मधील उर्वरीत ऊस बिलाचा २०० रुपयांचा अंतिम हप्ता हफ्ता बैलपोळ्याच्या सणानिमित्त शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.नेहमी पारदर्शक व शेतकरी हिताचा व्यवहार केला जाईल,असा विश्वास दत्ताभाऊंनी व्यक्त केला.

यावेळी श्री.दिनेश कुलकर्णी,श्री.गणेश कामटे, श्री.बालाजी कोरे, श्री.राजकुमार जाधव, श्री.अरविंद गोरे, श्री.देविदास कुलकर्णी, श्री.गजानन पाटील, श्री.मंगेश कुलकर्णी, श्री.विकास उबाळे,श्री.अभय शिंदे ,श्री.बालाजी जमाले,श्री. संजीव शिलवंत,श्री.मकरंद ढोबळे यांच्यासह खामसवाडी व देवकुरुळी येथील ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.प्रतीक देवळे यांनी केले.

## क्राईम न्युज

### एस टी बस मध्ये आरडा ओरड करणाऱ्या मद्यपीवर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत प्रशांत रा. कात्राबाद ता. परंडा जि. धाराशिव हे दि.१०.०८.२०२५ रोजी कुर्डवाडी ते परंडा बस मध्ये परंडा ते बार्शी रोडवर शिवाजी चौक परंडा येथे मद्यधुंद अवस्थेत आरडा ओरड करून गोंधळ घालताना परंडा पो. ठा. च्या पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द म.द.का. कलम ८५(१), अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूर बसस्थानकामध्ये बसमध्ये चढताना सोने-चांदीचे दागिणे व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी योगीता राम शेनमारे, वय ३० वर्षे, रा. पिंपळा बु. ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१०.०८.२०२५ रोजी जुन बस स्थानक तुळजापूर येथे तुळजापूर सोलापूर बसमध्ये चढत असताना योगीता शेनमारे यांचे पर्स मधील २० ग्रॅम सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने रोख रक्कम ३,००० असा एकुण १,२४,८०० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-योगीता शेनमारे यांनी दि.१०.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### विद्युत मोटारी,स्टार्टर आदि वस्तूची चोरी

उमरगा पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-इंद्रजित विठ्ठल गायकवाड, वय ६३ वर्षे, रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांचे माडज शिवारातील शेत गट नं ६/१/१ विहीरीवरील ७.५ एचपीची क्राटेक कंपनीची ईलेक्ट्रीक विद्युत पंप, सार्स्टर,टिकाव फावडे, पाणे वइतर शेत उपयोगी साहित्य एकुण १५,००० किंमतीचे दि.०६.०८.२०२५ रोजी ११.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- इंद्रजित गायकवाड यांनी दि.१०.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालाजी बाबुराव ढवन, वय ५५ वर्षे, रा. शिवरत्न नगर तुळजापूर खुर्द ता.तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल जुने बसस्थानक तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालाजी ढवन यांनी दि.३१.०७.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## गतवर्षीपेक्षा २५% कमी गणेश मूर्ती तयार, दर ३५ टक्के वाढले

धाराशिव (प्रतिनिधी)- गणरायाचे आगमन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहर व परिसरातील मूर्तिकारांच लगबग शिगेला पोहोचली आहे. मूर्तींना अंतिम रुप देण्यासह रंगरंगोटीच्या कामांना आता वेग आला आहे. मात्र, पीओपीवरील बंदी उठण्यास उशिर झाल्याने यंदा गतवर्षीच्या तुलनेत २५ टक्के कमी मूर्ती तयार झाल्या आहेत. मूर्ती कमी असल्याने दर ३५ टक्क्यांनी वधारले आहेत. गतवर्षी शहर परिसरातील ३५ कारखान्यात ८० हजार बाप्पांच्या मूर्ती तयार झाल्या होत्या. यंदा केवळ ६० हजार मूर्ती तयार झाल्या.

दरवर्षी मूर्तिकार एप्रिल व मे महिन्यात मूर्ती बनविण्याच्या कामांना सुरुवात करीत असतात. मात्र, न्यायालयाने पीओपीच्या मूर्तीवर बंदी घातल्याने मूर्तिकार पीओपीच्या गणेशमूर्ती तयार कराव्यात की नाही, या द्विधा मनःस्थितीत होते. एप्रिल मे महिन्यात अनेकांनी शाडूच्या मूर्ती बनवण्यास प्राधान्य दिले. मात्र, या मूर्तीस वेळ अधिक गेला.

शिवाय, मागणी कमी असल्याने मूर्ती मोजक्याच तयार केल्या. त्यानंतर १० जून रोजी पीओपीवरील बंदी उठवली. मात्र, दोन महिन्यांचा वेळ उर्वरित पान ४ शहरातील कारखान्यात ६ इंचापासून ते १० फुट उंचीपर्यंच्या मूर्ती आहेत.

त्याचे दरही आकारानुसार आहेत. ३०० रुपयांपासून ते थेट १५ हजार रुपयांपर्यंत मूर्ती विक्रीस आहेत. शहरातून लातूर, निलंगा, मुखेड, नांदेड, बीड या शहरांसह हैदराबाद, गुलबर्गा येथील व्यापाऱ्यांकडून मूर्तींना मागणी आहे. कारागिरांकडून मूर्ती तयार करण्याची ऑर्डर आता बंद केली. ६० टक्केच्या जवळपास मूर्तीही बूक झाल्या आहेत.

## अपघातात एकाचा मृत्यू तर दोघे जखमी सह शेळ्या-मेंढ्याचा मृत्यू

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाण अंतर्गत बाकर रा. चोदपूर तहसील पुखरायान जि. कानपुर उत्तरप्रदेश यांनी दि.०७.०८.२०२५ रोजी रेल्वेब्रिजवर येडशी येथे आपल्या ताब्यातील वाहन हे चालवून समोरील ट्रेलर व कंटेनर यांना पाठीमागून धडक दिली. या आपघतात मयत नामे-सोनवीर राम सनेही, रा. बिछौली पोस्ट ऐतहार जि. भिंड राज्य मध्येप्रदेश हे गंभीर जखमी होवून मयत झाले.तर फिर्यादी नामे-अरशद इस्तीखार वय १९ वर्षे, व्यव क्लिनर, रा. चांदोपुर पोस्ट अमरोधा जि. कानपुर राज्य उत्तरप्रदेश व बाकर आयुब हे जखमी झाले.तसेच वाहनाचे नुकसान करुन वाहानातील ७१ शेळ्या व १९ मेंढ्या या मयत झाल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अरशद इस्तीखार यांनी दि.१०.०८.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिव शहरातील वडार समाजासाठी कायमस्वरुपी स्मशानभूमी मिळावी



धाराशिव (प्रतिनिधी)- शहरातील विविध समाजासाठी शासनाने कपिलधारा या भागात स्मशानभूमीची वेगवेगळया समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था केलेली आहे. त्या ठिकाणी शेड, निवारा, रस्ता पाणी याची व्यवस्था केलेली आहे. परंतू धाराशिव शहरातील वडार समाजासाठी शासनाने (नगर पालिकेने) स्मशानभूमीची कायमस्वरुपी व्यवस्था केलेली नाही. सध्या ज्या ठिकाणी वडार समाजातील व्यक्तीवर अंत्य संस्कार होतात ती खुली (मोकळी) जागा ही कोणाच्या तरी मालकी हक्काची असल्याचे समजते. धाराशिव शहरातील माती, वडार, गाडी वडार, पाथ्रुड वडार हा सर्व समाज कष्टकरी असून या समाजाने कपिलधारा येथील स्मशानभूमीतील इतर सर्व समाजाच्या स्मशानभूमतील शेड, निवारा, रस्ते, कंपाऊंडवॉल इत्यादी सर्व कामे केली आहेत. परंतू शासनाच्या (नगर पालिका) दुर्लक्ष केल्याने हा समाज वंचित राहिला आहे. तरी मे. साहेबांना विनंती की, धाराशिव शहरातील वडार समाजासाठी तात्काळ स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती, सदर निवेदनाची दखल घेउन ठोस कार्यवाही तात्काळ न केल्यास नगर पालिका धाराशिव विरोधात मनसे आक्रमक आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, धाराशिव यांना देण्यात आलेले आहे.

## अतिवृष्टीचे अनुदान शेतकाऱ्यांना त्वरीत देण्यात यावे -संजय पाटील दुधगावकर

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ व फेब्रुवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीतील अतिवृष्टीचे अनुदान शेतकऱ्यांना त्वरीत देण्यात यावे, येत्या आठ दिवसात या दोन वर्षातील अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर देण्याबाबत तातडीने कार्यवाही करणेबाबत आदेशीत करावे, अन्यथा या विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

दिलेल्या निवेदनात श्री. दुधगावकर यांनी म्हटले की, धाराशिव जिल्ह्यामध्ये सप्टेबर- ऑक्टोबर २०२४ मध्ये ८० हजार शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे नुसान अतिवृष्टीमुळे झाले होते त्याबाबत आम्ही वेळवेळी पैसे मिळावेत म्हणून महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणून देऊनही अद्यापही ते अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेले नाही. त्याच प्रमाणे माहे एप्रिल, मे व जून २०२५ या कालावधीमध्ये अतीवृष्टी, सततचा पाऊस व वादळीवारा यामुळे ११५४६ शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेती पिकाचे, फळझाडे व भाजीपाला याचे नुकसान झाले आहे. त्यासंदर्भातील सर्व कागदपत्र शासनाकडे जिल्ह्याच्यावतीने पाठऊनही दिलेली आहेत. फक्त निधी मंजूर झाल्याच्या बातम्या येत आहेत, परंतू प्रत्यक्षात आजपर्यंत अतिवृष्टीचे कुठलेही अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेले नाही. त्यासाठी येत्या आठ दिवसात २०२४-२०२५ या दोन वर्षातील अतिवृष्टी नुकसानीचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर देण्याबाबत तातडीने कार्यवाही करणेबाबत आदेशीत करावे, अन्यथा या विरोधात लोकशाही मागार्ने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगांवकर यांनी दिला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## बहादुरीची प्रशांसा केली पाहिजे

७ मे रोजी भारतीय हवाई हल्ल्यानंतर अंदाजे १२५ भारतीय आणि पाकिस्तानी लढाऊ विमानांनी हवाई लढाईत भाग घेतला आणि एक तासाहून अधिक काळ चाललेल्या चकमकीत लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांच्या गोळीबाराची देवाणघेवाण झाली. पाकिस्तानी किंवा भारतीय विमानांनी सीमा ओलांडली नाही, त्याऐवजी कधीकधी १०० किमी पेक्षा जास्त अंतरावर स्टँड-ऑफ संघर्ष झाला. पाकिस्तानने दावा केला की हवाई चकमकी दरम्यान त्यांनी पाच भारतीय विमाने पाडली आहेत ज्यात तीन राफेल, एक मिग-२९, एक सुखोई एसयू-३० एमकेआय आणि एक हेरॉन मानवरहित हवाई वाहन यांचा समावेश आहे. यात किती तथ्य आहे हे सांगता येत नाही. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी दावा केला की पाकिस्तानने सहा भारतीय लढाऊ विमाने पाडली. कामरा येथील पीएएफ बेस मिनहास येथून पीएल-१५ दृश्यमान पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांनी सुसज्ज असलेल्या जे-१०सी मल्टीरोल लढाऊ विमानांसह कार्यरत असलेल्या स्क्वॉड्रनने तीन राफेल, एक मिग-२९, एक मिराज-२००० आणि एक एसयू-३०एमकेआय पाडल्याचा दावा केला. डॉनच्या वृत्तानुसार, कोब्राजने ७ मे रोजी इंटरसेप्ट ऑपरेशनसाठी स्क्वॉड्रनला नियुक्त केलेल्या २० पैकी १८ विमाने तैनात केली होती. हल्ल्यांनंतर पाकिस्तानकडून सीमेपलीकडून तोफांचा मारा आणि लहान शस्त्रांचा गोळीबार वाढला, भारत-प्रशासित जम्मू आणि काश्मीरमधील पूंच, राजौरी, कुपवाडा, बारामुल्ला, उरी आणि अखनूर या प्रदेशांचा समावेश आहे. पूंछ शहर आणि त्याच्या आसपासच्या परिसरात पाकिस्तानकडून झालेल्या गोळीबारात किमान ११ लोक मृत्युमुखी पडले आणि एका इस्लामिक शाळेसह अनेक घरांचे नुकसान झाले. द न्यूज मिनिटच्या वृत्तानुसार, मृतांमध्ये एका शीख रागीचाही समावेश आहे. पाकिस्तानने म्हटले आहे की सुरुवातीच्या भारतीय हल्ल्यांनंतर नीलम-झेलम जलविद्युत प्रकल्पाचे भारतीय गोळीबारात नुकसान झाले आहे. मुळात भारताने या कारवाईची अतिषय गुप्तता पाळली होती. ठराविकांना याची माहिती असू शकेल. मुळात भारतीय हवाई यंत्रणासह समुद्रमार्गाही तैनात ठेवण्यात आले होते असे नंतर सांगण्यात आले. भारतीय हवाई विमान कारवाईत तरबेज असणारे वैमानिकांवर जबाबदारी देण्यात आली होती. भारतीयांनी ऑपरेशन सिंदुर कारवाई यशस्वी केल्यानंतर जगाला भारताची ताकद कळाली. त्यानंतरच अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी काही ही वक्तव्य करण्यात सुरवात केली. भारत आणि पाकिस्तान दरम्यान युद्ध आम्ही थांबविले असे वादग्रस्त विधान केल्यानंतर याचे पडसाद भारतात उमटायाला लागले. याच काळात लोकसभेचे पावसाळी अधिवेशन सुरु झाले यात पंतप्रधान यांना खुलासा करावा लागला की, ऑपरेशन सिंदुर मुळे पाकिस्तान युद्धाच्या तयारीत होता मात्र त्यांची हिंमत झाली नाही. याचे श्रेय ट्रम्प घेत आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. त्यामुळे ट्रम्प या बाबतीत उघडे पडले. लोकसभेत खुलासा केल्यावरच अमेरिकेने टैरिफची घोषणा केली. ही चुकीची बाब आहे. यापुर्वी कधीही अमेरिकेने या बाबत पावले उचलली नाहीत. ट्रम्प सत्तेत येताच जगावर दबाबतंत्र आवलंबण्याचा हा डाव दिसून येत आहे. या बाबत भारताने विचार करून उचलले पाऊल योग्य आहे. पंतप्रधान व संरक्षणमंत्र्यानी या टैरिफ बाबत केलेले वक्तव्य स्वागतार्ह आहे. याला न घाबरता भारत आता स्वबळावरची वाटचाल दिसून येत आहे. भारत घाबरला नाही तर उलट जोमाने या बाबत मुकाबला करण्यात येणार आहे असे दिसून येत आहे. टैरिफचा परिणाम हा काही बाबतीत होणार आहे. असे जरी असले तरी भारताने या बाबत कसा मुकाबला करावयाचा याची रणनिती तयार केल्याचे दिसून येत आहे. भारतीय नागरिकांच्या मदतीने टैरिफचे संकट दूर होवू शकते. या बाबत दम महत्वाचा आहे. काही झाले तरी अमेरिकेचा हा दबाब तंत्राचा वापर आहे. याचा किती परिणाम होईल हे पहिल्यांदा पाहिले जाणार नंतर अमेरिका पुढचे पाऊल उचलेले असे दिसून येते. अमेरिकेची पाकिस्तान बरोबर जवळीक ही एकमेव भारताला डवचण्याचा प्रयत्न आहे. अमेरिका यांनी एकवेळ अशी येईल की, भारताला पाकिस्तानकडून तेल खरेदी करावे असे भाकित करणे हस्यास्पद असले तरी अमेरिका या बाबत पाकिस्तानला मदत करून भागीदारी होऊ शकते हा धोका भारताला असणार आहे. त्यामुळे भारताने सतत जपून पावले उचलली पाहिजेत. सध्याला भारत भावनिक उफाळून यावा म्हणून पाकिस्तानला जवळ करीत आहे. नको ते भाषा बोलत आहे. टैरिफच्या माध्यमातून आर्थिक झळ पोंहचण्याचे काम करणार आहे. त्यामुळे भारताला सतत सावध पावले उचलण्याची गरज आहे. जगात अमेरिकेचे वर्चस्व आहे. ते कायम राहावे. आपण महासत्ताधिश असावे. आपल्यापुढे रशियासुद्धा झुकावे असे विचार दिसून येत आहेत. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी टैरिफ बाबत चांगलेच फटकारले आहे. जनतेनी सुद्धा या बाबत एकी दाखवुन वाढविलेला टैरिफ बाबत पुर्नविचारास अमेरिकेस भाग पाडले पाहिजे. भारताची ऑपरेशन सिंदुर वरून अमेरिकाच काय जगाला या बाबत जाणीव झाली की, भारत सक्षम देश आहे. काही मिनीटात पाकिस्तानला पाणी पाजले. पाकव्याप्त काश्मीर मध्ये जे अतिरेक्यांचे प्रशिक्षित कॅम्प होते हे उद्धस्थ केले. याबाबत पाकिस्तानला जबरदस्त हादरा बसला आहे. आवघड जागेचे दुखणे असल्याने पाकिस्तान झालेली नामुष्की जगाला सांगू शकत नाही. काही तासात भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये चांगलाच हात दाखविला आहे. ट्रम्प म्हणत असेल मी मध्यस्थी केली ती चुकीची व निरर्थक बाब आहे. ज्यावेळी लोकसभेत हिवाळी अधिवेशात पंतप्रधान व संरक्षण मंत्र्यांनी निवेदन करताच विरोधी पक्ष गप्प झाला. त्यामुळे आता निवडणुक आयोगाकडे मोर्चा वळला असून महाराष्ट्रात निवडणुक काळातील घटनेबाबत संशया निर्माण करणे सुरु आहे. यावर कधी पडदा पडेल हे सांगता येत नाही मात्र जगाला ऑपरेशन सिंदुर मुळे भारताची ताकद जगाला कळली असून ट्रम्प उघडे पडले आहेत हे नक्की! असे असताना बहादुरीची प्रशांसा केली पाहिजे.

# मा. पंतप्रधानांनी अजनी (नागपूर)पुणे वंदे भारत, बेंगळुरूबेळगावि वंदे भारत आणि कटडाअमृतसर वंदे भारत एक्सप्रेस या तीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा






**नागपूर/प्रतिनिधी** : मा. पंतप्रधान श्री नरेन्द मोदी यांच्या हस्ते दि. १०.०८.२०२५ रोजी केएसआर बेंगळुरू रेल्वे स्थानक येथून अजनी (नागपूर)पुणे वंदे भारत, केएसआर बेंगळुरूबेळगावि वंदे भारत आणि श्री माता वैष्णो देवी कटडाअमृतसर वंदे भारत या ३ वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या प्रसंगी श्री थावर चंद गहलोत, मा. राज्यपाल, कर्नाटक; श्री सिद्धरामैया, मा. मुख्यमंत्री, कर्नाटक; तसेच श्री अश्विनी वैष्णव, मा. केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

श्री देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र; श्री नितीन गडकरी, मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री तसेच इतर मान्यवरांनी नागपूर रेल्वे स्थानकावरील कार्यक्रमाला उपस्थित राहून आणि व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे कार्यक्रमाशी जोडले गेले.

नागपूर (अजनी) पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या पहिल्या प्रवासाचा तो खास क्षण टिपण्यासाठी नागपूर स्थानक प्रवाशांच्या उत्साहाने गजबजलेले असून संपूर्ण वातावरण आनंदमय झाले होते; लोकांनी उत्साहाने छायाचित्रे घेतली आणि विदर्भातून आपला पहिला प्रवास सुरू करणाऱ्या, फुलांनी सजवलेल्या वंदे भारत गाडीचे प्लॅटफॉर्मवरून कौतुक केले.

**अजनी (नागपूर)** पुणे वंदे भारत एक्सप्रेसविषयी माहिती: अजनी (नागपूर) पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही आतापर्यंतची सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत असून हि ट्रेन ८८१ किमी अंतर पार करेल.

महाराष्ट्रातील ही १२वी वंदे भारत एक्सप्रेस आहे.

**वर्धा -- म**नमाडदरम्यान आतापर्यंत न पोहोचलेल्या भागाला सेवा देणारी ही पहिली वंदे भारत आहे.

नागपूर -- पुणे दरम्यानची ही सर्वात वेगवान गाडी असून सरासरी वेग ७३ किमी/तास आहे आणि प्रवासात १० थांबे आहेत.

**नागपूर** आणि पुणे ही दोन्ही वेगाने विकसित होत असलेली महानगरे असून येथे असंख्य लघु व मध्यम उद्योग, नामांकित शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्था तसेच ऐतिहासिक आणि पर्यटनस्थळे आहेत. अजनी (नागपूर) पुणे वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाल्यामुळे या दोन शहरांदरम्यान आणि मार्गावरील इतर शहरांदरम्यान काम, व्यवसाय, शिक्षण व पर्यटनासाठी प्रवास करणाऱ्या मोठ्या संख्येतील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. व्यापारी, विद्यार्थी, कर्मचारी यांना नियमित प्रवास व विशेष सहलींसाठी याचा लाभ होणार असून, व्यापार आणि वाणिज्य वाढीसोबतच पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

वंदे भारत एक्सप्रेसचे खास वैशिष्ट्ये सुविधा

**वातानुकूलित** : सर्व डबे वातानुकूलित प्रणालीने सुसज्ज

स्वयंचलित तापमान नियंत्रण: डब्यातील गर्दीच्या प्रमाणानुसार तापमान आपोआप समायोजित

बसण्याची व्यवस्था: लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सोयीस्कर बसण्याची रचना (एर्गोनॉमिक डिझाइन)

लाइटिंग सिस्टिम : सर्व डब्यांमध्ये एलईडी व सौम्य लाइटिंग

दरवाजे: सर्व डब्यांमध्ये स्वयंचलित स्लायडिंग दरवाजे

**खिडक्या:** निसर्गदृश्य पाहण्यासाठी मोठ्या पॅनोरामिक खिडक्या

शौचालये: बायो -व्हॅक्यूम तंत्रज्ञानयुक्त स्वच्छ व आधुनिक शौचालये

**संरक्षा सुविधा**

**आग सुरक्षा:** आगीची वेळेवर सूचना व विझवण्याची यंत्रणा

सीसीटीव्ही निगराणी: संपूर्ण ट्रेनमध्ये कॅमेऱ्याद्वारे सतत देखरेख

आपत्कालीन संवाद: प्रत्येक डब्यात इंटरकॉम प्रणाली

ब्रेक प्रणाली: ३०% पर्यंत उर्जा वाचवणारी पुनरुउत्पादन ब्रेक प्रणाली

**ड्युअल सस्पेन्शन प्रणाली:** जास्त वेगातही आरामदायक प्रवास सुनिश्चित.

'मेक इन इंडिया' उपक्रमाचा एक भाग म्हणून, ही एक्सप्रेस अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भरतेबाबत देशाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. या ट्रेनच्या लोकार्पणामुळे महाराष्ट्राची ओळख नवकल्पना आणि संपर्क केंद्र म्हणून अधिक बळकट होईल आणि प्रादेशिक समृद्धीला चालना मिळेल.

वंदे भारत एक्सप्रेस गाड्या आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधांचा कणा म्हणून काम करत, जोडलेल्या भारत सरकारच्या दूरदृष्टीचे हा सोहळा दर्शन घडवतो.

**अजनी (नागपूर)** पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या नियमित सेवांचे तपशील पुढीलप्रमाणे :

ट्रेन क्रमांक २६१०२ अजनीपुणे वंदे भारत एक्सप्रेस ही १२.०८.२०२५ पासून (सोमवार वगळता) आठवड्यातील ६ दिवस अजनी स्थानकावरून सकाळी ०९.५० वाजता सुटेल व पुणे येथे त्याच दिवशी रात्री २१.५० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्रमांक २६१०१ पुणेअजनी वंदे भारत एक्सप्रेस ही ११.०८.२०२५ पासून (मंगळवार वगळता) आठवड्यातील ६ दिवस पुणे स्थानक येथून सकाळी ०६.२५ वाजता सुटेल व अजनी येथे त्याच दिवशी संध्याकाळी १८.२५ वाजता पोहोचेल.

थांबे वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर आणि दौंड कॉर्ड लाईन.

संरचना: एकूण ८ कोच, ज्यामध्ये १ एक्झिक्युटिव्ह चेअर कार आणि ७ चेअर कार असून, एकूण ५३० प्रवाशांच्या बसण्याची सोय आहे (एक्झिक्युटिव्ह चेअर कार कोचमध्ये ५२ आसने, ५ चेअर कार कोचमध्ये प्रत्येकी ७८ आसने आणि लोको पायलटच्या कोचला जोडलेल्या २ चेअर कार कोचमध्ये प्रत्येकी ४४ आसने).

ट्रेन क्रमांक २६१०१ व २६१०२ पुणे- अजनी - पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या नियमित सेवेसाठीचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in](http://www.irctc.co.in) या संकेतस्थळावर खुले आहे.

या गाड्यांच्या सविस्तर वेळापत्रक व थांब्यांची माहिती जाणून घेण्यासाठी www.enquiry.indianrail.gov.in](http://www.enquiry.indianrail.gov.in) या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

# नवीन वीज उपकेंद्रामुळे श्रीरामपूरमधील उद्योगवाढीस चालना – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## श्रीरामपूर येथे २२०/३३ केव्ही उच्चदाब वीज उपकेंद्राचे भूमिपूजन

शिर्डी, दि. १३ श्रीरामपूर तालुक्याला भेडसावणाऱ्या अपुऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येचे निराकरण २२०/३३ केव्ही क्षमतेच्या उच्चदाब वीज उपकेंद्रामुळे होणार असून, शेती व एमआयडीसीमधील उद्योगांना पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा होईल आणि तालुक्यातील नवीन उद्योगांना चालना मिळेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

श्रीरामपूर एमआयडीसीमध्ये ५९ कोटी ६२ लाख रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या या उपकेंद्राचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपकेंद्राची प्रशासकीय मान्यता डॉ संजीव कुमार(भा.प्र. से.) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महाट्रांसको (महापारेषण)यांनी त्वरीत दिली तसेच या उपकेंद्राचे कार्यादेश श्री अविनाश निंबाळकर संचालक ( प्रकल्प) यांच्या कडून त्वरीत देण्यास आले.

याप्रसंगी कार्यक्रमाला आमदार हेमंत ओगले, महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्रीकृष्ण नवलाखे, अशोक मडावी, हादी खान, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, नितीन दिनकर, दीपक पठारे,



नानासाहेब शिंदे, सचिन गुजर आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनीच्या या प्रकल्पामुळे श्रीरामपूर औद्योगिक वसाहत, एमआयडीसी परिसर, बेलापूर, भोकर, नायगाव, हरेगाव, सुतगिरणी, शिरसगाव, उक्कलगाव, मातापूर आणि सन फ्रेश कंपनीसह परिसरातील वीजदाबाची समस्या कायमची दूर होईल. आजवर या भागात कमी दाबामुळे अनेक उद्योग अडचणीत होते. सुमारे ६० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाची कामे महाट्रान्सकोकडून एक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याने हे उपकेंद्र साकार होत आहे. राज्य विजेच्या बाबतीत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे. ६५ हजार मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज हायड्रो प्रकल्प आणि ३.२५ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून हे काम सुरू आहे. जुन्या प्रकल्पांचेही नूतनीकरण होत असून, सौर ऊर्जेच्या माध्यमातून राज्यातील ४० टक्के कृषी फिडर सौरऊर्जेवर आणण्याचा संकल्प आहे. त्यामुळे वीज दरात १० ते २६ टक्क्यांची घसरण होईल. नेट मीटरिंगमुळे घरगुती ग्राहकांनाही लाभ होत आहे. ७.५ हॉर्सपॉवरपर्यंत मोफत वीज देण्याचे धोरण कायम असून, राज्य विजेसंदर्भात स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासाठी १ लाख कोटींच्या जलसंधारण योजनांवर काम सुरू आहे. गोदावरी-जायकवाडी प्रकल्प, पाण्याचे पुनर्वहन, भंडारदऱ्यातील अतिरिक्त पाणी आणि खोऱ्यांमधील योजना राबवल्या जात आहेत. भाषणं व मोर्चे न काढता प्रत्यक्ष कामं होत आहेत, हेच शासनाचे खरे कार्य आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार हेमंत ओगले म्हणाले की, सध्या श्रीरामपूर तालुक्याला बाभळेश्वर व नेवासा तालुक्यातून वीजपुरवठा होत असल्यामुळे अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. नव्या उपकेंद्रामुळे या समस्या दूर होतील आणि एमआयडीसीमध्ये नवे उद्योगधंदे सुरू होऊन रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता संजीव भोळे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन अधिक्षक अभियंता श्रीकृष्ण नवलाखे यांनी केले.

### मुंबईत दहीहंडीच्या सणाला गालबोट, सरावादरम्यान चिमुकला वरच्या थरावरुन सटकून खाली पडला, बालगोविंदाचा करुण अंत

**मुंबई/प्रतिनिधी** अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या दहीहंडीच्या सणाला मुंबईत गालबोट लागले आहे. सध्या मुंबईत गोविंद पथकांकडून दहीहंडीचा जोरदार सराव सुरु आहे. या सरावादरम्यान, मुंबईच्या पश्चिम उपनगरातील एका बालगोविंदाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दहिसर पूर्वेला असणाऱ्या केतकीडपाडा परिसरात हा प्रकार घडला. यामध्ये नवतरुण गोविंदा पथकाचा बालगोविंदा महेश रमेश जाधव (वय ११) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, रविवारी रात्री अकरा वाजता दहिसरच्या केतकीपाडा परिसरात नवतरुण मंडळाकडून दहीहंडीचे थर रचण्याचा सराव सुरु होता. यावेळी या मंडळाचा बालगोविंदा महेश जाधव हा वरच्या थरावर (ऊदज चढला होता. तो वरच्या थरावर चढला असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो खाली पडला. तो थेट जमिनीवर कोसळल्याने त्याला जबर मार लागला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळतात दहिसर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी मृतदेहाचा पंचनामा

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाचे पाच नवीन विक्रम; एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान

**लातूर/प्रतिनिधी** :शून्य विद्युत अपघातासाठी जनजागृती अभियानातील विविध उपक्रमांत लोकसहभागाचे महावितरणने नवीन पाच विक्रम नोंदवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे. या दोन्ही संस्थांच्या वतीने सोमवारी (दि. ११) पाचही विक्रमाच्या नोंदीचे प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या संकल्पनेतून विद्युत सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातील लोकसहभागाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतल्याबद्दल त्यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा मयंक शाह यांनी विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांची घोषणा केली. त्यांनी या दोन्ही संस्थांच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत (मानव संसाधन), श्री. प्रसाद रेशमे (प्रकल्प), सौ. स्वाती व्यवहारे (वित्त) यांना प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा सन्मान केला. यावेळी एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा शाह यांनी महावितरणच्या पाचही विक्रमांची माहिती दिली. संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले, की 'लोकसहभागातून शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या अभियानाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल.'


महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते यात सुरक्षा संदेश देणाऱ्या मॅरेथॉनमध्ये ११ हजार ८८१, ऑनलाइन प्रश्नमंजूषेत ९६ हजार १५०, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धेत ७ हजार ५९३, विद्युत सुरक्षेच्या रॅलीमध्ये २७ हजार १५५ जण सहभागी झाले होते. तसेच दि. ६ जूनला एकाचवेळी ४२ हजार २०१ जणांनी विद्युत सुरक्षेची शपथ घेतली. यासह महावितरणकडून १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या सर्व उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.



भारत सरकारकडे नोंदणीकृत व वर्ल्ड रेकॉर्ड युनिव्हर्सिटीशी संलग्न एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आशियातील सर्व प्रमुख राष्ट्रीय बुक ऑफ रेकॉड्र्सचे परीक्षण करून नोंदी घेतल्या जातात. त्यानुसार महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानामध्ये प्रामुख्याने विद्युत सुरक्षा रॅली, मॅरेथॉन, विद्युत सुरक्षेची शपथ, ऑनलाइन प्रश्नमंजूषा तसेच 'एसएमएस' व 'इमेल'द्वारे ग्राहक संवादामध्ये लोकसहभागाच्या विक्रमांची नोंद केली. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. त्यानंतर या नोंदी एशिया बुक ऑफ रेकॉर्डकडे पाठविण्यात आल्या. त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्रोटोकॉलनुसार परीक्षण झाल्यानंतर या विक्रमांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

कार्यक्रमात कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत यांनी अभियानाची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमाला मुख्य अभियंते सर्वश्री मनीष वाठ, दत्तात्रेय बनसोडे, प्रशांत दानोळीकर, हरिश गजबे, वादिराज जहागिरदार, दीपक कुमठेकर, मिलिंद दिग्रसकर, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके आदींची उपस्थिती होती.

# खरी मैत्री



मैत्रीचे नाते या जगात सर्वात सुंदर मानले जाते, कारण या नात्यात रंग दिसत नाही, सौंदर्य नाही, पैसा नाही आणि भेदभाव नाही. यावर्षी मैत्री दिन ३ ऑगस्ट रोजी साजरा केला जाईल. जेव्हा जेव्हा कोणी खऱ्या मैत्रीचे उदाहरण देते तेव्हा सर्वात पहिले नाव श्रीकृष्ण आणि त्याचा मित्र सुदामा याचे येते. श्रीकृष्ण हा केवळ राजा किंवा देव नव्हता , तर तो प्रेमाचे प्रतीक, करुणेचा सागर आणि नातेसंबंध जपणारा एक मानव होता . एकीकडे, श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रात अर्जुनला धर्माचा मार्ग दाखवला, तर दुसरीकडे, आपल्या गरीब मित्र सुदामाचे पाय धुवून, त्यानी हे सिद्ध केले की प्रेम आणि मैत्री कोणत्याही राजेशाही पदाच्या किंवा सत्तेच्या वर आहेत.श्रीकृष्ण आणि सुदामा हे दो-घेही लहानपणी संदीपनी ऋषींच्या आश्रमात शिक्षण घेत होते. तेथे त्यांच्यात घनिष्ट मैत्री झाली. दोघेही एकत्र अभ्यास करत, खेळत आणि एकमेकांची मदत करत असत. एकदा गुरुंनी त्यांना जंगलात जाऊन लाकूड गोळा करण्यासाठी पाठवले. अच-ानक जोराचा पाऊस सुरू झाला आणि ते दोघे एका झाडाखाली आसरा घेऊन थांबले. त्या काळात सुदामाकडे थोडेसे पोहे होते. त्याने ते श्रीकृष्णला दिले नाहीत, पण श्रीकृष्णाला हे माहीत होते. तरीही त्याने त्याच्यावर राग व्यक्त केला नाही. सुदामाला याचा पश्चाताप झाला.

पण एक वेळ अशी आली की श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला आणि दुसरीकडे त्याचा मित्र सुदामा इतका गरीब झाला की घरात रोजच्या जेवणाची व्यवस्था करणेही त्याला कठीण झाले. सुदामा त्याच्या पत्नी आणि मुलांचे पालनपोषण करू शकत नव्हता. अशा परिस्थितीत एके दिवशी सुदामाची पत्नी सुशीला म्हणाली, 'तू श्रीकृष्णाचा बालपणीचा मित्र आहेस, आज तो द्वारकेचा राजा आहे. तुम्ही त्याच्याकडे मदत का मागत नाही ?' हे ऐकून सुदामा थोडासा संकोचला. पण त्याच्याकडे दुसरा कोणताही मार्ग उरला नव्हता. म्हणून त्याने विचार केला की तो द्वारकेला जाऊन कृष्णाला भेटेल.

सुदामा द्वारकेला जाण्यास तयार झाला, पण त्याला रिकाम्या हाताने जाणे योग्य वाटले नाही. मग त्याची पत्नी सुशीलाने घरातील थोडे शिल्लक असलेले पोहे घेतले आणि ते एका लहान गाठोड्यात बांधले आणि सुदामाला दिले - 'हे श्रीकृष्णाला दे .'

सुदामा त्याच्या मित्राला पोहे घेऊन भेटायला निघ-ाला. सुदामाला अजूनही आशा होती की कृष्ण त्याला पूर्वीप्रमाणेच स्वीकारेल. जेव्हा सुदामा श्रीकृष्णाच्या भव्य महालासमोर उभा राहिला तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या द्वारपालांनी त्याला अशा अवस्थेत पाहून त्याच्याकडे तिरस्काराने पाहिले. द्वारपालांनी सुदामाला विच-ारले, तू कोण आहेस? आणि तू कोणाला भेटायला आला आहेस?

सुदामा म्हणाला- 'मी श्रीकृष्णाचा बालपणीचा मित्र आहे आणि त्याला भेटायचे आहे.' हे ऐकून रक्षक हसायला लागले, मग थोड्या वेळाने ते आत गेले आणि श्रीकृष्णाला हे सांगितले. श्रीकृष्णाने आपल्या मित्राचे नाव ऐकताच, तो राजाचे रूप विसरला आणि राजवाड्यातून पळून गेला.

सुदामाला दारात उभे असलेले पाहून श्रीकृष्णाने त्याला मिठी मारली आणि त्याचे डोळे पाणा-वले. श्रीकृष्णाने सुदामाला राजवाड्यात नेले आणि त्याला त्याच्या सिंहासनावर बसवले. मग तो स्वतः त्याच्या अश्रूंनी त्याचे पाय धुवू लागला. हे दृश्य पाहून राजवाड्यात उपस्थित असलेले सर्वजण आश्चर्यचकित झाले.श्रीकृष्णाने सुदामाला विच-ारले, 'मित्रा, तू माझ्यासाठी काय आणले आ-हेस?' हे ऐकून सुदामाला लाज वाटली आणि त्याने ते गाठोडे लपवून ठेवले. पण श्रीकृष्णाला त्याच्या मित्राचे मन माहित होते. तो म्हणाला, तू आज माझ्या वाट्याचे पोहे लहानपणीसारखा लपवत आहेस का? असे म्हणत, श्रीकृष्णाने स्वतः सुदामाकडून ते गाठोडे घेतले आणि पोहे खाऊ लागला. श्रीकृष्णाने पहिली मुठ खाताच , त्याने सुदामाला एका जगाची संपत्ती दिली. दुसरी मुठ खाताच , सुदामाला दोन जगांची संपत्ती मिळाली. पण कृष्णाने तिसरी मूठ खायला सुरुवात करताच, रुक्मिणीने त्याला थांबवले आणि म्हणाली, 'प्रभु, जर तूम्ही तिन्ही लोक त्यांना दिले तर इतर प्राणी आणि देव कुठे जातील?' रुक्मिणीचे हे शब्द ऐकून श्रीकृष्ण थांबले. अशाप्रकारे, काहीही न बोलता, न विचारता, केवळ प्रेमाच्या भावनेच्या बदल्यात, श्रीकृष्णाने आपल्या मित्र सुदामाला आदर, संपत्ती आणि सुख आणि समृद्धीने भरून टाकले .

# मरेपर्यंत अशा लोकांना समाजात मिळत नाही मान

## त्यांचा होतो सतत अपमान



मुंबई: आचार्य चाणक्य यांनी आपल्या मचाणक्य नीतीफमध्ये जीवनातील अनेक पैलूंबद्दल मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या मते, काही वाईट सवयी किंवा कृत्ये अशी आहेत, ज्यामुळे व्यक्तीला समाजात मान मिळत नाही, सतत अपमान सहन करावा लागतो आणि त्याची प्रतिष्ठा कमी होते. अशा गोष्टींपासून नेहमी दूर राहावे, असे चाणक्य सांगतात.

**१. अहंकार आणि गर्व**

आचार्य चाणक्य म्हणतात की, ज्या व्यक्तीमध्ये अहंकार आणि गर्व असतो, त्याला समाजात कधीच आदर मिळत नाही. अशी व्यक्ती इतरांना तुच्छ लेखते आणि स्वतःला श्रेष्ठ मानते. यामुळे लोक त्यांच्यापासून दूर जातात आणि त्यांना अपमानित करतात. अहंकारी व्यक्तीला कधीही योग्य सल्ला मिळत नाही आणि त्यामुळे त्याचे नुकसान होते.

**२. खोटेपणा आणि फसवणूक**

खोटे बोलणे किंवा इतरांची फसवणूक करणे ही अत्यंत वाईट सवय आहे. चाणक्य नीतीनुसार, जी व्यक्ती सतत खोटे बोलते किंवा इतरांना फसवते, तिचा समाजात विश्वासघातकी म्हणून उल्लेख होतो. अशा व्यक्तीवर कोणीही विश्वास ठेवत नाही आणि त्यांना सर्वत्र अपमानाला सामोरे जावे लागते. एकदा विश्वास गमावल्यास तो परत मिळवणे खूप कठीण असते.

**३. दुसऱ्यांवर टीका करणे**

जी व्यक्ती सतत दुसऱ्यांवर टीका करते, त्यांच्या चुका काढते आणि त्यांची निंदा करते, तिला समाजात कधीच प्रिय मानले जात नाही. अशी व्यक्ती नकारात्मक ऊर्जा पसरवते आणि लोक तिच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. चाणक्यांनुसार, दुसऱ्यांवर टीका करण्याऐवजी स्वतःच्या चुका सुधारण्यावर लक्ष केंद्रित करावे.

**४. आळस आणि निष्क्रियता**

आळशी व्यक्तीला समाजात कधीच यश मिळत नाही आणि तिचा आदर केला जात नाही. चाणक्य म्हणतात की, जी व्यक्ती काम करण्याऐवजी आळस करते आणि निष्क्रिय राहते, तिला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा व्यक्तीला समाजात तुच्छ मानले जाते आणि तिला सतत अपमानाला सामोरे जावे लागते.

**५. लोभ आणि स्वार्थ**

लोभी आणि स्वार्थी व्यक्ती फक्त स्वतःच्या फायद्याचा विचार करते आणि इतरांचा वापर करते. चाणक्य नीतीन-ुसार, अशी व्यक्ती समाजात कधीच लोकप्रिय होत नाही. लोक त्यांच्यापासून अंतर ठेवतात कारण त्यांना माहीत असते की ही व्यक्ती केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीच संबंध ठेवते. यामुळे त्यांना समाजात मान खाली घालून जगावे लागते.

या वाईट सवयींपासून दूर राहूनच व्यक्ती समाजात आदर आणि प्रतिष्ठा मिळवू शकते, असे चाणक्य सांगतात.

# व्यापार करारामध्ये अनपेक्षित त्रिकूट




शुल्काचा तिढा सुटेपर्यंत कोणाशी व्यापार करार होणार नाही असे ट्रम्प म्हणाले आहेत. याचा अर्थ भारत-अमेरिका कराराचेही भवितव्य सध्या अधांतरी आहे. या काळात चीन व रशियाची कशी मदत होते ते बघावे लागेल.

ब्राझीलचे अध्यक्ष लुला डी सिल्व्हा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. त्याच्या दुसर्या दिवशी मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत व ब्राझीलवर ५० टक्के आयात शुल्क लादले आहे. त्याला तोंड कसे द्यायचे हा लुला-मोदी चर्चेतील मुख्य मुद्दा होता. या वर्षाच्या अखेरीस भारत-रशिया शिखर परिषद होत आहे. त्यासाठी 'आपले स्वागत करण्यास उत्सुक आ-होत' अशा आशयाचे निमंत्रण मोदी यांनी पुतिन यांना दिले. याच काळात चीनच्या परराष्ट्र खात्याने शिखर परिषदेसाठी चीन मोदी यांचे स्वागत करत आहे असे जाहीर केले. या तीन बाबी वेगवेगळ्या दिसल्या तरी त्यात एक सूत्र आहे. ट्रम्प यांनी सुरु केलेले व्यापार युद्ध या चारही देशांसाठी जाचक ठरत आहे. ही राष्ट्रे 'ब्रिक्स' गटाचे मुख्य सदस्य आहेत. ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात मोदी यांनी त्यांच्याशी मैत्री वाढवण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा कोणत्याही देशावर प्रत्युत्तर शुल्क लादण्याचा विचार ट्रम्प यांनी केला नव्हता. भारताचे चीनशी सख्य नसले तरी उघड शत्रुत्वही नव्हते. कोरोना काळात चीनने भारतात घुसखोरी केली आणि चित्र बदलले. त्यावेळी ट्रम्प यांनी भारताची पाठराखण केली. अमेरिकेचा चीन हा जुना प्रतिस्पर्धी आहे.

कोणास काय फायदा?

ट्रम्प केवळ लहरी नाहीत, तर उर्मट देखील आहेत. मोदी त्यांना मित्र म्हणत असले तरी ट्रम्प यांनी त्यांना तोंडघशी पाडले हे उघड आहे. भारतीय शेतकर्यांच्या हिताशी तडजोड करणार नाही असे म्हणणे मोदी यांना भाग आहे, अन्यथा ते कमकुवत असल्याचे चित्र निर्माण झाले असते. चीनची अर्थव्यवस्था आपल्यापेक्षा सुमारे सहापट मोठी आहे. अमेरिका वगळून अन्य देशांत त्याने निर्यात वाढवली आहे. गेल्या वर्षी चीनने ३ लाख ५८ कोटी डॉलर्सची निर्यात केली. भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षाही ती जास्त आहे. चीनचा आयात-निर्यातीतील नफा ९९१.४१ अब्ज डॉलर्स होता. २०२४-२५ मध्ये भारताची एकूण निर्यात ८२०.९३ अब्ज डॉलर्सची होती. चीन आर्थिक महासत्ता आहे हे त्यावरून पुन्हा स्पष्ट होते. त्याला अमेरिकेने लादलेल्या प्रत्युत्तर शुल्काची फारशी फिकीर असण्याचे कारण नाही. पुतिन आणि चीनचे अध्यक्ष झी ट्रम्प यांच्या इतकेच अहंकारी आ-हेत. तरीही ट्रम्प-पुतिन व ट्रम्प-झी यांच्यात चर्चा होण्याचे घाटत आहे. त्यामागे अमेरिकेचे हितसंबंध जपणे हे कारण असावे असे मानण्यास जागा आहे. या दोघांपेक्षा भारताची स्थिती थोडी वेगळी आहे. दोघेही 'क्वाड' गटाचे सदस्य आहेत. चीनला शह देण्यासाठी हा गट निर्माण झाला आहे. निर्यात, संरक्षण सामुग्री याबाबत आपण अमेरिकेवर बरेच अवलंबून आहोत. भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा मोठा महसूल अमेरिकेतून येतो. त्यामुळे अमेरिकेशी थेट भांडण करणे भारतास परवडणारे नाही. या महिना अखेरीस चीनमध्ये तिआनजिन शहरात शांघाय सहकार्य परिषदेची शिखर परिषद होत आहे. त्यास मोदी उपस्थित राहण्याची दाट शक्यता आहे. केंद्र सरकारने अजून त्याची अधिकृत घोषणा केलेली नाही. जेव्हा भारताची अमेरिकेशी जवळीक वाढली तेव्हा भारत-रशिया संबंधात ताण निर्माण झाला होता. पूर्व सीमेवर घुसखोरी केल्यापासून भारत-चीन संबंध बिघडले आहेत. आता अमेरिकेने भारताला फटका दिल्याने या दोन्ही देशांना आनंद होणे स्वाभाविक आहे. अमेरिकेच्या विरोधात भारतासह आघाडी उभारण्याचा त्यांचा मनसुबा असू शकतो; मात्र भारताने फार उत्साह दाखवलेला नाही. २०२० पूर्वीची स्थिती चीन निर्माण करत नाही, म्हणजेच पूर्ण माघार घेत नाही, तो पर्यंत भारत-चीन संबंध सुरळीत होणे अवघड आहे. ट्रम्प-पुतिन यांच्या चर्चेच्या फलितावर रशिया-भारत संबंधाची दिशा ठरेल, तर ट्रम्प-झी चर्चेत काय घडते यावर चीन-भारत संबंधांची दिशा ठरेल. त्या दोघांना भारताच्या आधाराची गरज आहे की भारताला त्या दोघांची, हे स्पष्ट होण्यास थोडा काळ जावा लागेल. रशिया हा भारताचा जुना मित्र असला तरी चीनबाबत तसे म्हणता येत नाही; पण ट्रम्प यांच्यामुळे अनपेक्षितपणे हे त्रिकूट निर्माण होऊ शकते.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रा-तवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियाच्या सिलेक्शनमध्ये मोठा ट्विस्ट, हार्दिक पांड्या अजून वेटिंगवर

दिल्ली–आशिया कप २०२५ सुरू होण्यास आता फक्त एक महिना उरला आहे. ज्यामुळे भारतीय संघ जोरदार तयारीला लागला आहे. मात्र, या मोठ्या स्पर्धेपूर्वी भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड आणि टीम व्यवस्थापन फक्त नेट प्रॅक्टिस आणि खेळाच्या रणनीतीवरच नव्हे, तर खेळाडूंच्या फिटनेस रिपोर्टवरही विशेष लक्ष ठेवत आहे. हार्दिक पांड्या, श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादवसारख्या महत्वाच्या खेळाडूंची फिटनेस टीमच्या संतुलन आणि सामन्यातील भूमिका ठरवण्यात निर्णायक ठरणार आहे.

तर, श्रेयस अय्यरने आपला फिटनेस टेस्ट यशस्वीपणे पूर्ण केला आहे. २७ ते २९ जुलै दरम्यान झालेल्या या परीक्षेत त्याने चांगली कामगिरी केली असून, त्यामुळे त्याच्या फॅन्सला मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या वर्षी तो टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळला नसला तरी आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमधील दमदार कामगिरीमुळे त्याच्या आशिया कप संघात परत येण्याच्या शक्यता वाढल्या आहेत.

हार्दिक पांड्यासाठी पुढील ४८ तास अत्यंत महत्वाचे आहेत. त्याचा फिटनेस टेस्ट ११ आणि १२ ऑगस्ट रोजी ञ्अ, बंगळुरूमध्ये होणार आहे. हार्दिक आधीच ञ्अ मध्ये दाखल झाला असून त्याने सोशल मीडियावरही काही फोटो पोस्ट करत ही माहिती दिली आहे. आता पाहावे लागेल की ते या टेस्टमध्ये पास होतात की नाहीत.

टीम इंडियाचा टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादवबाबत सस्पेन्स

टीम इंडियाचा टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादव अजूनही पुनरावृत्तीच्या प्रक्रियेत आहेत. जून महिन्याच्या सुरुवातीस त्याची हरनियाचा शस्त्रक्रिया झाली होती, तो सध्या पूर्णपणे फिट नाहीत आणि त्याला सुमारे आणखी एक आठवडा उपचार आणि पुनर्वसनासाठी लागेल. सध्या तो एनसीए मधील वैद्यकीय आणि फिजिओथेरपी टीमच्या देखरेखीखाली आहेत.

आशिया कप २०२५ ची सुरुवात ९ सप्टेंबरपासून युएईत होणार असून ही स्पर्धा २१ दिवस चालेल. टीम इंडियाच्या अंतिम संघाची घोषणा फिटनेस टेस्टचे निकाल येताच केली जाईल. सध्या चाहत्यांच्या नजरा या फिटनेस रिपोर्ट्सवर टिकलेले आहेत.

### हार्दिक पंड्यासाठी पुढील ४८ तास अत्यंत महत्वाचे; सूर्या, श्रेयसवरही टांगती तलवार

दिल्ली–आशिया कप २०२५ मध्ये आता एक महिन्यापेक्षा सुद्धा कमी वेळ शिल्लक आहे. गतविजेता टीम इंडिया पुन्हा एकदा आशिया कप चॅम्पियनचा खिताब जिंकण्यासाठी प्रयत्न करणार करेल. पण या मोठ्या स्पर्धेपूर्वी भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड आणि टीम मॅनेजमेंटची नजर ही फक्त नेट प्रॅक्टिस किंवा रणनीतीवर नाही तर खेळाडूंच्या फिटनेस रिपोर्टकडे सुद्धा लागल्या आहेत. विशेषत: हार्दिक पंड्या, श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव यासारख्या महत्त्वाच्या खेळाडूंची तंदुरुस्ती संघाचं संतुलन आणि रणनीती ठरवण्यात मोठी भूमिका बजावणार आहे.

हार्दिक पंड्या पास होणार की फेल?

भारतीय ऑलराउंडर हार्दिक पंड्यासाठी पुढील ४८ तास हे अत्यंत महत्वाचे आहेत. त्याचा फिटनेस टेस्ट ११ आणि १२ ऑगस्ट रोजी ञ्अ बंगळुरूमध्ये होणार आहे. हार्दिक पंड्या एनसीएमध्ये पोहोचला असून सोशल मीडियावरून त्याने फॅन्सला याबाबतची माहिती सुद्धा दिली होती. तेव्हा आता हे पाहणं महत्वाचं ठरेल की फिटनेस टेस्ट पास करण्यात तो यशस्वी होतो की नाही.

श्रेयस अय्यरने आधीच दिली टेस्ट :

टीम इंडियाचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. २७ ते २९ जुलै दरम्यान श्रेयसची टेस्ट झाली असून यात तो पास झाला हे. श्रेयसने २०२३ मध्ये शेवटचा टी २० आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. पण आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये जबरदस्त प्रदर्शन केल्याने आशिया कप २०२५ च्या संघात त्याचं पुनरागमन निश्चित मानलं जातंय.

सूर्यकुमार यादव रिकव्हरी मोडमध्ये :

टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवची स्थिती थोडी वेगळी आहे. तो आता पूर्णपणे फिट नाहीये. त्याला पूर्णपणे फिट होण्यासाठी एक आठवडा लागू शकतो. सध्या तो एनसीए मध्ये मेडिकल स्टाफ आणि फिजियोच्या निरीक्षणाखाली आहे. जूनच्या सुरुवातीला त्याचे हार्नियाचे ऑपरेशन झाले होते, त्यानंतर तो सध्या रिहॅबमध्ये आहे.

आशिया कपला कधी होणार सुरुवात?

आशिया कप २०२५ ची सुरुवात ९ सप्टेंबर पासून होणार असून याचा फायनल सामना हा २८ सप्टेंबर रोजी होणार आहे. टीम इंडियाच्या अधिकृत संघाची घोषणा ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात होणार आहे. त्यापूर्वी सर्व खेळाडूंनी फिटनेस टेस्ट पास करणे महत्वाचे आहे. १४ सप्टेंबर रोजी भारताचा ग्रुप स्टेज सामना पाकिस्तान सोबत होणार आहे.

**

### चार दावेदार, जागा दोन! आशिया कपमध्ये कोण करणार टीम इंडियासाठी ओपनिंग?

नवी दिल्ली–इंग्लंड दौरा संपल्यानंतर टीम इंडियाची पुढची मोठी परीक्षा म्हणजे आशिया कप. या स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होणार असून सर्व सामने यूएईमध्ये खेळले जातील. टीम इंडिया आपला पहिला सामना १० सप्टेंबरला यूएईविरुद्ध खेळेल, तर १४ सप्टेंबरला पाकिस्तानविरुद्ध बहुप्रतीक्षित सामना रंगणार आहे. मात्र, या स्पर्धेपूर्वी निवड समितीसमोर मोठं कोडं उभं राहिलं आहे, ते म्हणजे ओपनिंगसाठी कोणाला निवडायचं? कारण शुभमन गिल आणि यशस्वी जैस्वाल यांचा काही काळापासून टी–२० संघात सहभाग नव्हता.

गिल–यशस्वीचा बराच काळ टी–२० मधून बाहेर...

गिल आणि यशस्वी यांनी शेवटचा टी–२० सामना जुलै २०२४ मध्ये श्रीलंकेविरुद्ध पल्लेकल येथे खेळला होता. त्यानंतर झालेल्या बांग्लादेश, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकांमध्ये ओपनिंगची जबाबदारी अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनकडे होती. आता गिल–यशस्वी परतले, तर जागा कोणाला मिळणार हा मोठा प्रश्न आहे.

अजीत आगरकर समितीसमोर कठीण आव्हान

सॅमसनने उघड केले होते की बांग्लादेश मालिकेपूर्वी कर्णधार सूर्यकुमार यादवने त्याला सात सामन्यांसाठी ओपनिंगची जबाबदारी दिली होती, तीन बांग्लादेशविरुद्ध आणि चार दक्षिण आफ्रिकेविरुद्ध. या सात सामन्यांत त्याने तीन शतके झळकावून स्वत:ला सिद्ध केलं. दुसरीकडे, अभिषेक सध्या टी–२०चा क्रमांक एक फलंदाज आहे आणि त्याच्या धडाकेबाज खेळीमुळे संघाला मोठा फायदा झाला आहे. गिल हा कसोटी संघाचा कर्णधार आहे. तर यशस्वी हा विस्फोटक सलामीवीर म्हणून ओळखला जातो.

## देशातील दुसरे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम बंगळुरूमध्ये उभारले जाणार



बंगळुरू: कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बंगळुरूमधील बोम्मासंद्राच्या सूर्या सिटीमध्ये एक भव्य नवीन क्रिकेट स्टेडियम बांधण्याची घोषणा केली आहे. या स्टेडियमची क्षमता ८० हजार प्रेक्षकांची असून, प्रेक्षक क्षमतेच्या बाबतीत हे देशातील दुसरे सर्वात मोठे स्टेडियम ठरेल. सध्या अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम हे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम आहे.

१,६५० कोटी रुपयांचा प्रकल्प

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १६५० कोटी रुपये खर्चून उभारला जाईल आणि त्याचा संपूर्ण खर्च कर्नाटक गृहनिर्माण मंडळाकडून केला जाणार आहे. हे नवीन स्टेडियम सध्याच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमपासून सुमारे २२ किलोमीटर दूर आहे. नुकत्याच रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या (ठउइ) आयपीएल विजयाच्या सोहळ्यादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर हे स्टेडियम बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे म्हटले जाते. या घटनेत ११ जणांना आपला जीव गमवावा लागला होता.नवनीत राणांना धमकावल्याप्रकरणी पाच अटकेत

अमरावती : माजी खासदार नवनीत राणा यांना त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून अश्लील शिवीगाळ तसेच जिवे मारण्याची धमकी देणारा व्हिडीओ (रिल) पोस्ट करणाऱ्या ...

केवळ स्टेडियम नव्हे, क्रीडा संकुल

या प्रकल्पात केवळ क्रिकेट मैदानच नाही, तर अनेक आधुनिक सुविधा असणार आहेत. यामध्ये आठ इनडोअर आणि आठ आऊटडोअर क्रीडा सुविधा, एक अत्याधुनिक जिम, प्रशिक्षण केंद्र, स्विमिंग पूल, गेस्ट हाऊस, हॉस्टेल, हॉटेल आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी कन्व्हेन्शन हॉल यांचा समावेश आहे. हे स्टेडियम बंगळुरूमधील बीसीसीआयच्या नवीन राष्ट्रीय क्रिकेट अकादमीप्रमाणे विकसित होण्याची शक्यता आहे. यामुळे स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडूंनाही याचा मोठा फायदा होणार आहे.

## डेव्हिडच्या झंझावातामुळे ऑस्ट्रेलियाची विजयी सलामी; दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी मात

डार्विन–टीम डेव्हिडच्या (५२ चेंडूंत ८३ धावा) झंझावाती खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने रविवारी झालेल्या पहिल्या ट्वेन्टी–२० क्रिकेट सामन्यात पाहुण्या दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी मात केली. यासह तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने १–० अशी आघाडी मिळवली.

अडखळत्या सुरुवातीनंतर डेव्हिडच्या आक्रमक खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने २० षटकांत १७८ धावांची मजल मारली. आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ९ बाद १६१ धावाच करता आल्या. रायन रिकल्टन (५५ चेंडूंत ७१) आणि ट्रिस्टन स्टब्स (२७ चेंडूंत ३७) यांचे प्रयत्न अपुरे पडले. ऑस्ट्रेलियाकडून बेन ड्वारशस (३२६) आणि जोश हेझलवूड (३२७) या वेगवान गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. मधल्या षटकांत अॅडम झॅम्पाची (२३३) फिरकीही प्रभावी ठरली. त्याआधी, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला फलंदाजीचे आमंत्रण दिले. ऑस्ट्रेलियाची ३ बाद ३० अशी स्थिती होती. त्यावेळी कॅमरुन ग्रीनने (१३ चेंडूंत ३५) फटकेबाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला.

परंतु चांगल्या सुरुवातीनंतर तो बाद झाला. यानंतर डेव्हिडने डावाची सूत्रे आपल्या हाती घेतली.



## भारतीय क्रिकेटर आकाशदीपवर आरटीओची मोठी कारवाई

**बिना नंबर प्लेटची फॉर्च्युनर कार चालवणे पडले महागात**

लखनऊ: भारतीय क्रिकेटपटू आकाशदीप सिंहला नुकतीच घेतलेली टोयोटा फॉर्च्युनर कार अडचणीत आणणारी ठरली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करत, नोंदणी आणि उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट (क्षठझ) शिवाय गाडी चालवल्यामुळे उत्तर प्रदेश परिवहन विभागाने त्यांच्यावर आणि गाडी विकणाऱ्या डीलरशिपवर कठोर कारवाई केली आहे.

काय आहे प्रकरण?

आकाशदीप याने नुकतीच लखनऊमधील मेसर्स सनी मोटर्स या डीलरकडून एक नवीन फॉर्च्युनर खरेदी केली होती. त्यांनी आपल्या कुटुंबासोबत नव्या गाडीचा फोटो इंस्टाग्रामवर शेअर केला होता. मात्र, तपासणीत असे समोर आले की, गाडीची विक्री ७ ऑगस्ट रोजी झाली, विमा ८ ऑगस्ट रोजी काढला गेला, परंतु रोड टॅक्स भरला गेला नव्हता आणि नोंदणी प्रक्रिया अपूर्ण होती. तरीही, ही गाडी सार्वजनिक रस्त्यांवर वापरली जात होती.

झालेली कारवाई

परिवहन विभागाने आकाशदीपला मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ३९, ४१(६) आणि २०७ अंतर्गत नोटीस पाठवली आहे. नोंदणी, क्षठझ आणि वैध विमा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत गाडी सार्वजनिक रस्त्यावर न चालवण्याची सक्त ताकीद देण्यात आली आहे. नियम मोडल्यास गाडी जप्त केली जाईल आणि कायदेशीर कारवाई केली जाईल.

**डीलरवर कारवाई–**डीलर मेसर्स सनी मोटर्स यांनी नोंदणी पूर्ण न करताच आणि क्षठझ न लावता गाडीची डिलिव्हरी दिली, हे केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४४ चे उल्लंघन असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे परिवहन विभागाने डीलरच्या 'ट्रेड सर्टिफिकेट' (व्यापारी परवाना) ला एक महिन्यासाठी निलंबित केले आहे. या काळात डीलर कोणतीही गाडी विकू, नोंदणी करू किंवा डिलिव्हर करू शकणार नाही. जर या नियमांचे उल्लंघन झाले तर, परवाना रद्द केला जाईल

## करिअर बुडण्याची भीती, मुंबईचे खेळाडू घाबरतात

**गावसकर–तेंडुलकरचे नाव घेऊन सरफराज बोलला तरी काय?**

मुंबई–टीम इंडियाचा स्टार खेळाडू सरफराज खान याने मुंबईच्या सर्व खेळाडूंना कांगा लीग खेळण्याचं आवाहन केलं आहे. या स्पर्धेत अपयशी ठरलो तर भविष्यावर परिणाम होईल, असं काही खेळाडूंना वाटतं, पण सचिन तेंडुलकर आणि सुनिल गावसकर यांनीही असाच विचार केला असता, तर ते एवढे महान झाले नसते, असं सरफराज खान म्हणाला आहे.गेल्या वर्षी भारतासाठी टेस्ट क्रिकेटमध्ये पदार्पणापासून, सरफराजने ६ सामन्यांमध्ये ३७.१ च्या सरासरीने ३७१ रन केल्या आहेत, ज्यामध्ये त्याच्या नावावर एक शतक आहे. अजित आगरकरच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय निवड समितीने अंडरसन–तेंडुलकर ट्रॉफीसाठी सरफराज खानची टीम इंडियात निवड केली नव्हती.कांगा लीग जुलै ते ऑक्टोबर दरम्यान मुंबईच्या पावसाळी हंगामात आयोजित केली जाते. ढगाळ आकाश आणि ओलावा असलेल्या खेळपट्ट्यांवर बॅटरना रन करणं आव्हानात्मक असतं, त्यामुळे मुंबईच्या क्रिकेटमध्ये कांगा लीगला विशेष महत्त्व आहे. पार्कोफोन क्रिकेटर्सचं प्रतिनिधित्व करताना सरफराज खानने इस्लाम जिमखानाविरुद्ध ४२ बॉलमध्ये ६१ रनची उत्तम खेळी केली.

गावस्कर, तेंडुलकर, संदीप पाटील आणि दिलीप वेंगसरकर यांच्यासारखे मुंबईचे दिग्गज खेळाडू त्यांच्या व्यग्र वेळापत्रकामध्येही कांगा लीगचे सामने खेळायचे.

'माझ्या लहानपणी, मी माझे वडील (प्रशिक्षक नौशाद खान) यांच्याकडून अनेक गोष्टी ऐकल्या होत्या, की गावस्कर सर त्याच दिवशी सकाळी इंग्लंडहून परतले तरीही कांगा लीग सामन्यासाठी कसे आले होते', असं सरफराज मिड–डेशी बोलताना म्हणाला.

'तर, मुशीर (धाकटा भाऊ) आणि मी नेहमीच या स्पर्धेत खेळण्याचा अभिमान बाळगतो. काल संध्याकाळी (शनिवारी) नागपूरहून परतताना, आम्हाला आशा होती की आज पाऊस पडणार नाही. मुंबईच्या सर्व खेळाडूंनी कांगा लीग खेळावी. काही खेळाडूंना वाटते की जर ते येथे अपयशी ठरलो तर ते त्यांच्या भविष्यासाठी वाईट ठरेल. पण जर गावस्कर सर आणि सचिन तेंडुलकर सरांनी असाच विचार केला असता, तर ते कदाचित पुढे दिग्गज बनले नसते', असं सरफराज म्हणाला.


## आकाश दीपने डकेटच्या कानात काय सांगितले? स्वत: खुलासा करत म्हणाला, ममी म्हटले की, तू नेहमीच..

मुंबई –ओव्हलच्या मैदानामध्ये भारत आणि इंग्लंडदरम्यानच्या कसोटी सामन्यात झालेल्या हायव्होल्टेज सामन्यानंतर एका आठवड्याने भारताचा वेगवान गोलंदाज आकाश दीपने मैदानातील घडामोडींबद्दल आपले मौन सोडले आहे. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेट आणि आकाश दीपमध्ये नेमके काय घडले यावर स्वत: आकाशने प्रकाश टाकलाय. मालिकेतील पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी या दोघांमध्ये मैदानात बाचाबाचीची घटना घडली. आकाश दीपने डकेटला बाद केल्यानंतर तो मैदानाबाहेर जात असताना त्याच्या खांद्यावर हात टाकला होता. यावेळी आकाश दीप डकेटला काहीतरी सांगत असल्याचे दिसून आले. डकेटने आकाश दीपचे ऐकून घेतले आणि तो शांत राहिला. तो आकाश दीपला काहीही बोलला नाही. मात्र या कृतीमुळे आकाश दीप अडचणीत आला असता, असे म्हटले जात आहे.

चांगली कामगिरी करुनही...

डकेट बाद झाल्यानंतर त्याला निरोप देण्यापूर्वी दोघांमध्येही वाद झाला. दोघांमध्ये शब्दिक देवाणघेवाण झाली. आकाश दीपने आता यासंदर्भात खुलासा केला आहे की डकेटने तू मला बाद करु शकणार नाही, असे सांगितलेले. डकेटचे हे विधान ऐकून आकाश दीप संतापला होता. विशेषत: डकेटविरुद्ध आपली सात्यतपूर्ण चांगली कामगिरी असताना तो असे बोललाच कसा याचा आकाश दीपला राग आला. मफ्डकेटविरुद्ध माझा रेकॉर्ड चांगला आहे आणि मी त्याला अनेकदा बाद केले आहे,फ्फ असं आकाश दीपने मरेव्हस्पोर्ट्झफ्ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

डकेटने आकाश दीपला काय म्हटले होते?



मफ्मी नेहमीच डावखुऱ्या फलंदाजांविरुद्ध मला विकेट घेण्याची संधी असते असे मानतो आणि डकेट याला अपवाद नाही. त्या दिवशी तो मला माझ्या लाईन आणि लेंथपासून दूर चेंडू फेकण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करत होता. त्याने अनेक हटके शॉट्स खेळले. तेव्हा फलंदाजी करताना त्याने मला सांगितले की आजचा दिवस त्याचा आहे आणि मी त्याला बाद करू शकणार नाही, डकेटच्या रणनीतींमुळे सुरुवातीला त्याच्यासाठी गोलंदाजी करणे आव्हानात्मक होते, परंतु शेवटी ब्रेकथ्रू मिळाल्यावर मला उत्साह आला, असे आकाश दीपने प्रांजळपणे कबूल केले.

डकेटच्या कानात काय बोलला आकाश दीप? स्वत: केला खुलासा

मफ्अगदी खरे सांगायचे झाले तर एखादा फलंदाज खेळपट्टीवर फिरला आणि असे हटके शॉट्स खेळला तर तुमच्या लाईन आणि लेंथवर परिणाम होतो, कारण तुम्हाला खरोखर ठाऊक नसते की तो पुढे काय करेल. त्यादिवशी तेच घडत होते. तसेच, इंग्लंडची सुरुवात वेगवान झाली होती आणि आम्हाला विकेटची आवश्यकता होती. आम्ही अगदीच सामान्य धावसंख्येचा बचाव करत होतो आणि विकेट अत्यंत महत्त्वाच्या होत्या. जेव्हा मी त्याला बाद केले, तेव्हा मी त्याला म्हणालो: मयू मीस आय हीट असे झाले हे! मी त्याला म्हटले की, तू नेहमीच जिंकणार नाहीस. यावेळी, मी जिंकतोफ् तो मला जे सांगत होता त्याचाच हा एक भाग होता. जो काही प्रकार मैदानात झाला तो सर्व चांगल्या भावनेने केले,फ्फ असे आकाश दीप म्हणाला.

मालिकेत वादच वाद–आकाश दीप आणि बेन डकेट यांच्यात झालेला संघर्ष हा या मालिकेतील एकमेव वाद नव्हता. लॉर्ड्स कसोटीपासूनच दोन्ही संघांमध्ये मैदानात तणाव निर्माण झाला होता, जो झॅक क्रॉलीने तिसऱ्या दिवसाच्या शेवटच्या ओव्हरमध्ये जाणूनबुजून वेळ वाया घालवल्यामुळेही वाद निर्माण झाला होता. या कृत्याने भारतीय संघाला, विशेषत: शुभमन गिल फार रागावला होता. चौथ्या कसोटीपर्यंत हा संघर्ष तीव्र झाला आणि पाचव्या कसोटीपूर्वी भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि ग्राउंड्समन ली कर्टिस यांच्यात जोरदार संघर्ष झाला.

## इस्रायलच्या हल्ल्यात १०० गोल करणाऱ्या फुटबॉल खेळाडूचा मृत्यू

**दिल्ली–**पॅलेस्टाईनमध्ये इस्रायलचा हल्ला सुरुच आहे. या हल्ल्यात पॅलेस्टाईनचा नंबर वन खेळाडूचा मृत्यू झाला. हा फुटबॉल खेळाडू मदत मागण्यासाठी गाझा इथं गेला असताना हा हल्ला झाला. पॅलेस्टाईन फुटबॉल असोसिएशनने याची पुष्टी केली आहे. १०० हून अधिक गोल करणाऱ्या या खेळाडूच्या मृत्यूमुळे फुटबॉल जगतात शोककळा पसरली आहे.

पीएफएच्या मते, ऑक्टोबर २०२३ मध्ये युद्ध सुरु झाल्यापासून इस्रायली हल्ल्यात अनेक खेळाडूंचा मृत्यू झाला आहे, परंतु सुलेमान अल–ओबेदच्या मृत्यूनं सर्वांना धक्का बसला आहे.सुलेमान अल–ओबेदचा मृत्यू कसा झाला? : ४१ वर्षीय सुलेमान अल–ओबेद पॅलेस्टाईन राष्ट्रीय फुटबॉल संघाचा नंबर वन खेळाडू होता. बुधवार, ६ ऑगस्ट रोजी तो दक्षिण गाझामध्ये मदतीची वाट पाहत रांगेत उभा होता. या काळात इस्रायली गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. ओबेदला सर्वकालीन सर्वोत्तम फुटबॉल खेळाडूंपैकी एक मानलं जातं आणि या कारणास्तव त्याला



'पॅलेस्टाईन फुटबॉलचा पेले' असं टोपणनाव देण्यात आलं. त्यानं त्याच्या कारकिर्दीत १०० हून अधिक गोल केले.

पीएफएनं काय म्हटलं? पीएफएनं एका निवेदनात म्हटलं आहे की माजी पॅलेस्टिनी राष्ट्रीय खेळाडू आणि खादमत अल–शाती संघाचा स्टार सुलेमान अल–ओबेद याचं ६ ऑगस्ट रोजी गोळीबारात निधन झाले. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत, अल



ओबेदनं १०० हून अधिक गोल केले, ज्यामुळे तो पॅलेस्टिनी फुटबॉलमधील सर्वात तेजस्वी तार्यांपैकी एक बनले. गाझामध्ये फुटबॉलशी संबंधित मृत्यूंची संख्या आता ३२१ हून अधिक झाली आहे. यामध्ये खेळाडू, प्रशिक्षक, पंच आणि क्लब बोर्ड सदस्यांचा समावेश आहे.

सुलेमान अल–ओबेदने खेळले २४ आंतरराष्ट्रीय सामने : सुलेमान अल–ओबेदनं २४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले, ज्यात त्यानं दोन गोल केले. या गोलपैकी सर्वात प्रसिद्ध गोल २०१० च्या पश्चिम आशियाई फुटबॉल फ डरेशन चॅम्पियनशिप दरम्यान येमेनविरुद्धचा सिझर किक गोल होता. २०११ मध्ये त्यानं इंडोनेशियाविरुद्ध दुसरा गोल केला.

१०० हून अधिक गोल : त्यानं २००७ च्या पश्चिम आशियाई चॅम्पियनशिपमध्ये इराकविरुद्ध राष्ट्रीय संघात पदार्पण केलं आणि आशियाई कप, पॅन अरब गेम्स आणि फिफा विश्वचषक पात्रता यासारख्या प्रमुख स्पर्धांमध्ये पॅलेस्टाईनचं प्रतिनिधित्व केलं. त्यानं २०१३ मध्ये कतारविरुद्ध राष्ट्रीय संघासाठी शेवटचा सामना खेळला. याशिवाय, तो खिदमत अल शतिया, शबाब अल अमारी आणि गाझा स्पोर्ट सारख्या क्लबसाठी खेळला. २०१६ ते २०१८ दरम्यान, त्यानं सलग तीन हंगाम गाझा स्ट्रिप प्रीमियर लीगमध्ये गोल्डन बूट जिंकला आणि त्याच्या कारकिर्दीत १०० हून अधिक गोल केले.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत ₹३,९०० कोटींच्या पहिल्या हप्त्याचे राष्ट्रव्यापी डिजिटल हस्तांतरण ३५ लाख शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षेकडे ऐतिहासिक पाऊल

### शेतकऱ्यांची सेवा हे माझे मिशन, भारताची शेती देशात क्रमांक एक करणे हा माझा संकल्प : केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान

### शेतकरी आत्मनिर्भर झाला तरच देश आत्मनिर्भर होईल : मुख्यमंत्री, राजस्थान भजनलाल शर्मा








झुंझुनू (राजस्थान), ११ ऑगस्ट २०२५ राजस्थानातील झुंझुनू येथे केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान आणि राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या हस्ते प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत डीबीटी–आधारित दावा रकमेचे राष्ट्रव्यापी डिजिटल हस्तांतरण करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत रब्बी २०२४–२५ व पूर्वीच्या हंगामांच्या पहिल्या हप्त्यातून प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे देशभरातील ३५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ₹३,९०० कोटींहून अधिक रक्कम जमा करण्यात आली. यापैकी फक्त राजस्थानातील ९.७० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ₹१,४२६ कोटींचा लाभ मिळाला.

झुंझुनू विमानतळ पटांगणावर झालेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमास झुंझुनू, सीकर, जयपूर, कोटपूतली–बहरोडसह विविध जिल्ह्यांतील सुमारे ३५,००० शेतकरी प्रत्यक्ष उपस्थित होते, तर देशभरातील २३ राज्यांतील लाखो शेतकरी ऑनलाइन जोडले गेले होते.

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी भाषणात सांगितले की, ''कृषकांची सेवा हे माझे मिशन आहे आणि भारताची शेती देशात क्रमांक एक करणे हा माझा संकल्प आहे. आता एखाद्या गावातील एका शेतकऱ्याचेही पीक नष्ट झाले तरी त्याला मदत मिळेल. किमान आधारभूत किमतीवर उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा जोडूनच दर दिला जाईल. भाज्या दिल्ली किंवा जयपूरला नेण्यासाठीचा ट्रक भाडा सरकार उचलेल.''
मुख्यमंत्री भजनलाल शर्मा म्हणाले की, ''यमुना आणि चंबळ पाणी करारामुळे शेखावाटीतील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होईल. शेतकऱ्यांना आता सन्मानजनक भाव, बोनस आणि किसान सन्मान निधी वाढीव प्रमाणात मिळत आहे. लवकरच किसान सन्मान निधी ₹१२,००० प्रतिवर्ष करण्यात येईल.''

केंद्रीय राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांनी सांगितले की, ''पीक विमा योजनेत आता गाव व तालुका हे मुख्य घटक असतील, त्यामुळे एकही शेतकरी वंचित राहणार नाही. विकसित कृषि अभियानामुळे प्रयोगशाळा थेट शेताशी जोडल्या जात आहेत.''

राजस्थानचे कृषी मंत्री डॉ. किरोडी लाल मीणा यांनी स्पष्ट केले की, ''राजस्थानला सर्वाधिक ₹१,४२६ कोटींचा लाभ मिळाला असून, बनावट खत विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली आहे.''

२०१६ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री पीक विमा योजना नैसर्गिक आपत्ती, हवामानातील अतिरेक, कीड–रोग यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देते. आतापर्यंत ७८ कोटींहून अधिक अर्जांवर ₹१.८३ लाख कोटींची दाव्यांची भरपाई झाली आहे.

नवीन डीबीटी–आधारित हप्त्यांतील पेमेंट प्रणालीमुळे शेतकऱ्यांना राज्याचा हिस्सा उशिरा मिळाला तरी केंद्राचा हिस्सा वेळेवर मिळेल. खरीप २०२५ पासून राज्याने सबसिडी उशिरा दिल्यास १२% दंड आकारला जाईल आणि विमा कंपन्यांनी उशीर केल्यास शेतकऱ्यांना थेट १२% व्याज मिळेल. योजनेत YES-TECH, WINDS, पोर्टल, AIDE मोबाइल ॲप, कृषी रक्षक पोर्टल आणि १४४४७ हेल्पलाइनसारखे तांत्रिक नवोपक्रम जोडले गेले आहेत.

कार्यक्रमाचा समारोप या संदेशाने झाला की, प्रधानमंत्री पीक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या सुरक्षेचे भक्कम कवच आहे आणि केंद्र व राज्य सरकार मिळून ती आणखी प्रभावी करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

## समाजभुषण पुरस्कर्त्यांना दरमहा १५ हजार रूपये मानधन मिळावे; मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** वंचीत, उपेक्षित व दलित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले आयुष्य समर्पित भावनेने कार्य केलेल्या समाजभुषण पुरस्कार प्राप्त व्यक्तींना दरमहा रूपये १५ हजार मानधन देण्यात यावे. या मागणीचे निवेदन सामाजिक न्याय महाराष्ट्र शासन सन्मानित समाजभुषण पुरस्कार प्राप्त संयोजन समितीच्यावतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शिष्टमंडळाने भेट घेवून निवेदन दिले.

अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभागाकडून समाजभुषण पुरस्कार देवून सन्मानीत केलेल्या समाजभुषण पुरस्कारर्थींचे वृध्पदकाळात त्यांना कोणत्याही कसल्याही प्रकारच्या उपजिवीकेसाठी आधार नसल्याने व सबंध आयुष्य सामाजिक कार्यात गेल्याने त्यांची उपासमार होत आहे. म्हणून शासनाने दरमहा १५ हजार रूपये मानधन द्यावे अशी मागणी करण्यात आली असुन त्याचबरोबर समाजभुषण पुरस्कारर्थींना साध्या बसमध्ये प्रवास करण्याची परवानगी आहे पण शिवशाही आणि शिवाई या एसटी बसमध्ये प्रवास करण्याची त्यांना परवानगी देण्यात यावी व मानधन मंजुर करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे समाजभुषण पुरस्कार प्राप्त संयोजन समितीच्यावतीने करण्यात आली असुन या शिष्टमंडळात शेषेराव करखेलीकर, लक्ष्मण तिकटे, श्रीहरी कांबळे, केशव कांबळे, भुजंगराव कांबळे, शामराव सुर्यवंशी, ॲड.अंगद गायकवाड, नागनाथ कांबळे, संपत्ती तिकटे, राजकुमार कटके, रामराव गवळी, तुकाराम कावळे आदि समाजभुषण पुरस्कार प्राप्त उपस्थित होते.

## वाढदिवसा निमित्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यानी गरीब विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करावे : प्रा. अनंत लांडगे



**लातूर/प्रतिनिधी:** शाळे मध्ये अनेक गरीब विध्यार्थी शिक्षण घेत असतात, घरची गरिबीची परिस्थिती असल्या मुळे अनेक विध्यार्थ्यांना वह्या पुस्तके नसतात, शाळा मध्ये गणवेश, वह्या, पुस्तकं वाटपाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अशा प्रसंगी आपल्या वाढदिवसा निमित्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी गरीब विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करावे व आपला वाढदिवस साजरा करावा असे आवाहन प्रा, अनंत लांडगे यांनी एका बैठकीत केले . सेवा निवृतांच्या विवीध प्रश्ना वर चर्चा केल्यानंतर लातूर शहर अधक्ष पी एस कांबळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला , डॉ, बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ लातूर ची बैठक संपन्न झाली त्या बैठकीत त्यांनी वरील आवाहन केले, या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विनायक बोरीकर हे होते, बैठीकीला प्रा, अनंत लांडगे, बलभीम कोथिंबीरे, प्रा, शंकर सोनवणे, प्रा, विजय श्रृंगारे, प्रा, देविदास शिंदे, रमेश श्रृंगारे, माणिक पवार, बी, बी, गायकवाड, पी, एस, कांबळे, मोहन कांबळे सेलूकर, अंकुश रोडे, हेमंत गुळवे किनगावकर, सह बहू संख्य सेवानिवृत्त उपसस्थित होते, अंकुश रोडे यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली.

## विद्यार्थ्यांनी स्वक्षमता ओळखून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी-सागर वरंडेकर



**उदगीर/प्रतिनिधी:** उदगीर विद्यार्थ्यांनी स्वतःमधील क्षमता ओळखून संयमाने परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्यास यश मिळू शकते, असे प्रतिपादन देवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के होते. मंचावर उपप्राचार्य डॉ.एस. एन. हल्लाळे, प्रमुख पाहुणे लातूरच्या राजमुद्रा स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक प्रा.महेश मोरे, माजी विद्यार्थी तथा दिग्दर्शक संतोष राम, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य प्रा.मनोहर पटवारी, डॉ. रामप्रसाद लखोटिया यांची उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने प्रा. मनोहर पटवारी, डॉ. रेखा रेड्डी, डॉ.रामप्रसाद लखोटिया, महादेव नौबदे यांनी महाविद्यालयाने स्तुत्य उपक्रम राबवल्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. आगामी काळात स्पर्धा परीक्षा या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

पुढे बोलताना वरंडेकर म्हणाले धाडस ,धीर व दृष्टी असली की यशाची सृष्टी साकार होते, लक्ष अचूक ठेवले की भक्ष होत नाही, किती तास वाचण्यापेक्षा काय वाचले महत्त्वाचे असून प्रबुद्धतेने अभ्यासात सातत्य असले की यश येते. यावेळी प्रा. मोरे म्हणाले स्पर्धा परीक्षेत सातत्य शिवाय यश शक्य नाही. पुस्तकाला गुरु मानून शिक्षक आई- वडील यांच्या मार्गदर्शनाने यश मिळवावे. दिग्दर्शक संतोष राम म्हणाले विद्यार्थ्यांनी साधी राहणी व उच्च विचारसरणीचा अंगीकार करून येणाऱ्या आव्हानावर विजय मिळवावा. समारोपात डॉ. राजकुमार मस्के म्हणाले स्पर्धा परीक्षेत प्रामाणिक राहून स्वतःशी स्पर्धा करून यश प्राप्त करावे.

प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. डॉ.एस.ए.मुळे यांनी तर आभार प्रा डॉ.एस. एन. घोंगडे यांनी मानले.

## रुद्रेश्वर मंदिरात सतरा फुटी महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना



**लातूर/प्रतिनिधी:** लातूरच्या एलआयसी कॉलनी येथील रुद्रेश्वर मंदिराच्या प्रांगणात श्रावण मासाचे औचित्य साधत सोमवारी भव्य अशा सतरा फुटी महादेव मूर्तीची भक्तीमय वातावरणात प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

रुद्रेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभागीय सरसंघचालक संजय अग्रवाल ,शहर संघचालक उमाकांत मद्रेवार, माजी महापौर सुरेश पवार, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, काँग्रेसचे प्रभाग अठराचे अध्यक्ष सुंदर पाटील कव्हेकर,श्याम बलवतकर,महेश पाटील, गणेश कोलपाक,शोभा पाटील, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, व्यंकटेश कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मूर्तीकार अजय मुंदडा यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी संजय अग्रवाल,सुरेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप माधवराव पाटील टाकळीकर यांनी केला. रुद्रेश्वर प्रतिष्ठानचे मुख्य समन्वयक तथा माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी प्रास्ताविकात सोहळ्याच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. सूत्रसंचालन भालचंद्र येडवे पाटील यांनी केले. आभार शिवशंकर मळभागे व बनसोडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय एकशेट्टे,संजय धुम्मा,प्रदीप पाटील,शिवशंकर स्वामी,महादेवी बिराजदार,महेश करवंदे,मन्मथ बोळेगावे,शिवकुमार बिरादार,विनायक माने,अशोक घुमरे,महेश,राजू बिराजदार, आदींनी परिश्रम घेतले. सोहळ्यास रुद्र प्रतिष्ठानचे पदाधिकारी व परिसरातील भाविक भक्तांसह महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## नेरुळमधील सुश्रूषा हॉस्पिटलला शॉर्टसर्किटमुळे आग; रुग्णांची तातडीने सुरक्षित सुटका

**नवी मुंबई/प्रतिनिधी:** नेरुळमधील प्रमुख हृदयविकार उपचार केंद्र असलेल्या सुश्रूषा हॉस्पिटलमध्ये सोमवारी सकाळी शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. ही घटना सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुम ारास घडली असून, रुग्णालयातील संगणक यंत्रणेत शॉर्टसर्किट झाल्यानंतर काही क्षणातच आग पसरली. घटनेची माहिती मिळताच रुग्णालय प्रशासनाने तात्काळ सर्व रुग्णांना सुरक्षित स्थळी हलविण्याची प्रक्रिया सुरू केली. रुग्णांना जवळील सामाजिक संस्थेच्या हॉलमध्ये हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू ठेवण्यात आले आहेत.आग विझविण्यासाठी वाशी, नेरुळ आणि सीबीडी बेलापूर अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाचे जवान आग विझविण्याचे प्रयत्न करत असून, घटनेवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## दक्षिण पश्चिम रेल्वेच्या हुब्बळ्ळि विभागातील विजयपुर–बागलकोट विभागात दुहेरीकरणाच्या कामामुळे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात धावणाऱ्या गाड्यांवर परिणाम




**सोलापूर/प्रतिनिधी:** दक्षिण पश्चिम रेल्वेच्या हुब्बळ्ळि विभागातील विजयपुर–बागलकोट विभागात दुहेरीकरणाच्या कामामुळे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात धावणाऱ्या गाड्यांवर परिणाम

दक्षिण पश्चिम रेल्वेच्या हुब्बळ्ळि विभागातील विजयपुर–बागलकोट विभागात दुहेरीकरणाच्या कामासाठी रेल्वे विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक चालवत आहे. त्यामुळे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जाणाऱ्या गाड्यांवर पुढीलप्रमाणे परिणाम होतील:

खालील तपशीलांनुसार खालील गाड्या अलमट्टि येथे थांबणार नाहीत:
- ट्रेन क्रमांक १६५३५/१६५३६ मैसूर–पंढरपूर गोलगुंबज एक्सप्रेस या १८/१९.०८.२०२५ ते २२/२३.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक ११११३९/१११४० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई–होसपेटे एक्सप्रेस या १८/१९.०८.२०२५ ते २२/२३.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक १६२१८ साईनगर शिर्डी–मैसूर साप्ताहिक एक्सप्रेस या २०.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक १७३२४ बनारस–हुब्बळ्ळि साप्ताहिक एक्सप्रेस या १७.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत

खालील तपशीलांनुसार खालील गाड्या विजयपुर येथे कमी वेळाचे टर्मिनेशन करतील:
- ट्रेन क्रमांक १७३०७/१७३०८ मैसूर–बागलकोट बसवा एक्सप्रेस या १३/१४.०८.२०२५ ते २२/२३.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक ११११३९/१११४० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई–होसपेटे एक्सप्रेस या १३/१४.०८.२०२५ ते २२/२३.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत

डाव्हर्जन: -ट्रेन क्रमांक १७३१९/१७३२० हुब्बळ्ळि–हैदराबाद एक्सप्रेस या १५/१६.०८.२०२५ ते २२.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत गदग–होसपेटे–बल्लारी–गुंतकल–रायचूर–यरमरस–चिकसुगूर–यदलापूर–कृष्णा–नालवार उत्तर–वाडी मार्गे वळवण्यात आली असुन आलूर ते शाहबाद दरम्यानचे थांबे वगळण्यात आले आहेत.

खालील तपशीलांनुसार सदरच्या गाड्या रद्द राहतील:
- ट्रेन क्रमांक ११४१५/११४१६ सोलापूर–होसपेटे या १४/१५.०८.२०२५ ते २३/२४.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक ५६९०६/५६९०५ हुब्बळ्ळि–सोलापूर या १६/१७.०८.२०२५ ते २३/२४.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत
- ट्रेन क्रमांक ५६९०४/५६९०३ धारवाड–सोलापूर या १६/१७.०८.२०२५ ते २३/२४.०८.२०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत

प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी या परिणामांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार त्यांचा प्रवास नियोजन करावा.

## मित्रांसोबत विहिरीत पोहायला गेला पण परत आलाच नाही, काळाने केला घात!

**मुंबई/प्रतिनिधी:** वसई पूर्वेतील धुमाळनगर येथे एका दुर्दैवी घटनेत १७ वर्षीय समशूल खान या तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जेव्हा समशूल आणि त्याचे तीन ते चार मित्र पुजा इंजिनिअरिंग समोर असलेल्या विहिरीत पोहण्यासाठी गेले होते. त्याचवेळी काळाने घात केला अन् समशूलला आपला जीव गमावावा लागला.सर्व मित्र विहिरीतून सुखरूप बाहेर आले, मात्र समशूल मात्र बाहेर आला नाही. यानंतर तातडीने स्थानिकांनी अग्निशमन दलाला बोलवलं. अग्निशमन दल आणि पोलिसांनी सुमारे पाच तास शोधमोहीम राबवून अखेर सम शूलचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. त्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाल्याचं पहायला मिळालं. तब्बल पाच तास पोलिसांची शोधमोहीम सुरू होती.नागेश शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, धुमाळनगर येथील या विहिरीत नेहमीच स्थानिक मुले पोहण्यासाठी उतरतात. अनेक वेळा नागरिकांनी या विहिरीवर लोखंडी जाळी बसवण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष झाले आणि ती विहीर खुलीच राहिली. स्थानिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने एका तरुणाला जीव गमावावा लागला आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, नागरिकांकडून आता अधिक तीव्रतेने सुरक्षिततेच्या उपाययोजनांची मागणी केली जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तृप्ती सुरेश सोनवणे यांना पीएच.डी प्रदान



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील हिंदी विभागातील संशोधन केंद्रामधील विद्यार्थीनी तृप्ती सुरेश सोनवणे यांना हिंदी विषयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर या विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय '२१ वी सदी की प्रथम दशक की हिंदी कहानी मे स्त्री विमर्श' हा होता.त्यांचे संशोधक मार्गदर्शक कळंब येथील डॉ.दत्ता साकोळे हे होते. त्यांनी स्त्रियांच्या समस्या आणि विविध क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान यावर अनेक वर्तमानपत्रातून आणि शोधनिबंधातून लेखन केलेले आहे. सदर संशोधनासाठी त्यांचे वडील कै. सुरेश सोनवणे, आई अरुणा सुरेश सोनवणे आणि बंधू सार्थक सोनवणे यांच्याकडून प्रेरणा मिळाली. रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाडा विभाग प्रमुख डॉ.जयसिंगराव देशमुख यांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

सदर संशोधनासाठी त्यांना रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.केशव क्षीरसागर , प्रा.विवेकानंद चव्हाण , यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड ,व्यंकटेश महाजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, प्रा.डॉ. अशोक मर्डे , डॉ. विनोद वायचळ त्याचबरोबर त्यांचे नातेवाईक यांचे त्यांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सहकार्य मिळाले.

पीएच.डी पदवी प्राप्त केल्या बद्दल रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांचे विविध स्तरातून या यशाबद्दल कौतुक केले जात आहे.

# मोकाट, पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे धाराशिवकर त्रस्त

## शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

धाराशिव (प्रतिनिधी)- मोकाट, पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्या शहरात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अशा कुत्र्यांमुळे धाराशिवकर जनता त्रस्त झाली असून लहान मुले, वृद्धांना बाहेर फिरणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त करा अन्यथा जिल्हाधिकारी व नगर परिषद कार्यालयात कुत्रे सोडण्यात येतील असा इशारा शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) च्यावतीने देण्यात आला आहे.

शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील तीन वर्षे नगर पालिकेवर प्रशासक असल्यामुळे सर्व कारभार मुख्याधिकाऱ्यांच्या अधिकारावर चालतो. या काळात धाराशिव शहरवाशीयांचे इतके हाल चालु आहेत की, त्यांना कोणीच वाली उरला नाही. स्वच्छतेचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. त्यात संपूर्ण शहरात मोकाट, पिसाळलेल्या कुत्र्यांचा या अस्वच्छतेमुळे वावर वाढला असून त्यांची शहरात इतकी संख्या झाली आहे की, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले यांना या पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे बाहेर फिरणेही मुश्कील झाले आहे. मागील वर्षी खाजा नगर भागात पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे एकाला जीव गमवावा लागला. वेळोवेळी नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याशी निवेदनाद्वारे तसेच मागील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली याबाबतीत मिटींग घेवुनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आठवडाभरात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेला आदेशित करुन कायमचा बंदोबस्त करावा. अन्यथा शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षामार्फत शहरातील मोकाट, पिसाळलेली कुत्री स्वखर्चाने पकडून जिल्हाधिकारी कार्यालय तसेच नगर पालिका कार्यालयामध्ये सोडण्यात येतील, कार्यालयातील कर्मचाऱ्याना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्यास त्यास शासन जबाबदार असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रणवीर इंगळे, आयाज शेख, एजाज काझी, पृथ्वीराज चिलवंत, खलिफा कुरेशी, बाबा मुजावर, पंकज भोसले, धनंजय शहापूर, कुणाल कर्णवर, महादेव माळी, शाहनवाज सय्यद, जयंत देशमुख, सुरज वडवले, सरफराज कुरेशी, ज्योती माळाळे आदींची स्वाक्षरी आहे.



# कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व वृत्तपत्रामध्ये प्रमाण लेखनाचे महत्त्व या विषयावर धाराशिव येथे पत्रकारांसाठी कार्यशाळा

धाराशिव (जिमाका) जिल्हा माहिती कार्यालय,धाराशिवच्यावतीने जिल्ह्यातील माध्यमांच्या प्रतिनिधींसाठी पत्रकार कार्यशाळेचे आयोजन १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता जिल्हा नियोजन समिती,सभागृह धाराशिव येथे करण्यात आले आहे.या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार हे करतील.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या कार्यशाळेत जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे हे माध्यमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर आणि परभणी येथील प्रा. दीपक रंगारी हे वृत्तपत्रामध्ये प्रमाण लेखनाचे महत्त्व या विषयावर विस्तृत मार्गदर्शन करणार आहे.पत्रकारांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती विभागीय माहिती कार्यालय लातूरचे सहायक संचालक डॉ.श्याम टरके हे देतील.

जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी या कार्यशाळेला उपस्थित रहावे.असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी केले आहे.

# सात घरकुल लाभार्थींना १४ ब्रास वाळूचे वाटप



कळंब(प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या नव्या वाळू धोरणानुसार घरकुल बांधकामासाठी लाभार्थींना मोफत वाळू देण्याची घोषणा करण्यात आली होती. या घोषणेनुसार अखेर कळंब तालुक्यात वाळू वाटपाला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ७ लाभार्थींना १४ ब्रास वाळूचे वितरण करण्यात आले आहे.

नव्या वाळू धोरणानुसार शासनाने घरकुल बांधकामासाठी लाभार्थींना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शासन-निर्णय निर्गमित केले आहेत. मात्र पावसाळा अगदी तोंडावर आल्यावरही वाळू उपलब्ध होत नसल्याने, मोफत वाळू धोरणाची अंमलबजावणी कधी होणार, असा प्रश्न घरकुल लाभार्थींमधून उपस्थित होत आहे. तालुकास्तरीय समितीकडून वाळू गट निश्चित करायचे आहे. त्यानुसार रूपरेषा निश्चित केली. मात्र कळंब येथे अनेक घरकुलाच्या लाभार्थींनी वाळूची मागणी प्रशासनाकडे केली होती.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्तात्रय तनपुरे यांनी महसूल प्रशासनाला निवेदन देऊन लाभार्थींना मोफत वाळू देण्यासाठी पाठपुरावा केला होता.

८० ब्रास वाळू शिल्लक पूर्वी डिकसळ येथे शासकीय दराने वाळू वाटपासाठी एक ठेकेदार नेमण्यात आला होता. परंतु वाटप प्रक्रिया निकृष्ट व अपारदर्शक असल्याचे आढळले. यामुळे संबंधित ठेकेदाराचा ठेका काही दिवसांपूर्वी रद्द करण्यात आला होता. डिकसळ येथील स्टँडवर ८० ब्रास वाळू शिल्लक आहे, त्याच वाळूचा उपयोग आता घरकुल लाभार्थ्यांसाठी करण्यात येत आहे.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव - कळंब मतदारसंघात शिवसेनेचे सदस्य नोंदणी अभियान

## गावागावात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करा - जिल्हाप्रमुख सुरज साळुंके



धाराशिव(प्रतिनिधी)-शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी धाराशिव - कळंब विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. पक्षप्रमुख भाई एकनाथजी शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी गावागावात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख साळुंके यांनी केले.

आगामी नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व ज्येष्ठ शिवसैनिकांची बैठक धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि. १०) घेण्यात आली. यावेळी मतदार संघातील गट, ग निहाय विभाग प्रमुखांच्या निवडी करण्यात आल्या.

जिल्हाप्रमुख साळुंके म्हणाले की, धाराशिव - कळंब विधानसभा मतदारसंघातील गावागावात शिवसेना पक्षाचे संघटन मोठे आहे. हे संघटन वाढविण्यासाठी प्रत्येक गावात किमान दोनशेपेक्षा अधिक सदस्य नोंदणी अपेक्षित आहे. शिवसेना पक्षप्रमुख भाई एकनाथजी शिंदे यांच्या गाव तिथे शाखा आणि गाव तिथे शिवसैनिक या संकल्पनेला अधिक बळ देण्याकरिता नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती क्षेत्रात विभाग प्रमुखांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

त्याचबरोबर राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक हे धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्यावर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची बैठक आयोजित करण्यात आली असून त्यावेळी आगामी निवडणुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस शिवसेनेचे धाराशिव - कळंब विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

सदस्य नोंदणी अभियानच्या अनुषंगाने धाराशिव - कळंब विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व विभाग प्रमुखांच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये कळंब उपतालुका प्रमुखपदी भगवान ओव्हाळ तर विभाग प्रमुखपदी संजय बारकुल (येरमाळा), रामकिसन वाघमारे (मोहा), बालाजी कवडे (इटकुर), समाधान फेरे (पळसप), अविनाश गोफणे (अंबेजवळगे), रामचंद्र कदम (उपळा मा.) यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची धाराशिव तालुका कार्यकारणी जाहीर

धाराशिव (प्रतिनिधी) - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या धाराशिव तालुक्याची कार्यकारणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष ऍड धीरज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या हस्ते नियुक्त पत्र देऊन धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर यांनी दि.१० ऑगस्ट रोजी जाहीर केली. या कार्यकारणीमध्ये ग्रामीण भागातील नवयुवकांना नेतृत्वाला संधी दिली आहे. त्यामुळे काँग्रेसचे विचार तळागाळात पोहचविण्यासाठी ही टीम जोमाने कामाला लागली आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीची धाराशिव तालुका कार्यकारणीची निवड धाराशिव शहरातील काँग्रेस भवनमध्ये कार्यकारणीच्या बैठकीत करण्यात आली आहे. यामध्ये धाराशिव तालुका उपाध्यक्षपदी बालाजी हुबाले (येवती), भालचंद्र कळमकर (उपळा मा.), सुधीर गव्हाणे (रुईभर) यांची तर तालुका सरचिटणीसपदी लक्ष्मीकांत खटके (नांदुर्गा), अमोल पाटील (सांगवी), महेश उंबरे (वाघोली), विकास ढवळे (पाडोळी आ.) व रहीम मुलाणी (कोंड) यांची तसेच तालुका सचिवपदी चंद्रकांत माळी (तेर), अकबर शेख (राजुरी) व दिगंबर गायकवाड (टाकळी बें.) यांची तसेच तालुका सहसचिवपदी धनंजय पाटील (अनुसूर्डा), जाफर शेख (सुंभा), रामेश्वर लोकरे (घुगी) व इमाम शेख-पटेल (बोरगाव राजे) यांची आणि तालुका खजिनदारपदी ऍड राजुदास आडे (शिंगोली) यांची निवड करण्यात आली.

यावेळी काँग्रेस कमिटीचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, आयुब पठाण, महबूब पटेल, धनंजय राऊत, भारत काटे, संकेत पडवळ, संतोष वडवले, प्रकाश माळी, विजय चव्हाण, कानिफनाथ देवकुळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारी वाटणी घेतलीस व हालकी वाटणी दिलीस म्हणून मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत सुरेश रामभाउ भैरट, रामभाउ तुकाराम भैरट, जिजाबाई जगन्नाथ भैरट,ति. रा. शेलगाव ता. वाशी, तात्यासाहेब दादाराव शिंगटे, रा. दहीफळ ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी शेलगाव येथे फिर्यादी नामे-वर्षा काशिनाथ भैरट, वय ३५ वर्षे, रा. शेलगाव ता. वाशी जि. धाराशिव यांना भारी वाटणी घेतलीस व हालकी वाटणी दिलीस या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी व कुह्राडीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-वर्षा भैरट यांनी दि.०७.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे वाशी येथे भा.न्या. सं.कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२,३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# दोघांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -सलीम अमीर आमजा तांबोळी, वय ५६ वर्षे, रा. हागड गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे व गोडावूनचे शटर तय्यब उर्फ गुड्डु अब्दुल धाराशिव, सुरज धाराशिव व इतर साथीदार यांनी दि.०२.०८.२०२५ रोजी उचकटुन आत प्रवेश करुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सलीम तांबोळी यांनी दि.०६.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (४), ३०५, ६२, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649